# डॉ. स्मिता दामले



# आठवणींचे मणीहार



# आठवणींचे मणीहार

डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# आठवणींचे मणीहार

## डॉ. स्मिता दामले

Emails:

suhasdamle341@hotmail.com

suhas.smita48@gmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन : ५ जून २०२४**

©esahity Pratishthan®2024

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे बारावे पुस्तक, “आठवणींचा मणीहार” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहाबरोबरच त्यांचा काचांची नक्षी हाही कथा संग्रह वाचकांना आवडला. त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त”

हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते "इतिहासाची विलग पाने". इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र

बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

“असं घडलं होतं” व “अस्ताचलावरील तारे” या नवव्या ४५० पानी व दहाव्या दोनशे पानी पुस्तकात त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं, का घडलं होतं आणि असं घडलं होतं, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

बाराव्या लहान पुस्तिकेतून त्यांनी वसईच्या इतिहासाचा वेध घेतला आहे आणि त्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली तेरा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

# आठवणींचे मणीहार

**डॉ. स्मिता दामले..**

suhasdamle341@hotmail.com

# आठवणींचे मणीहार०

या जंबुद्वीपावरील, भारत वर्षातील काळाच्या संदूकीत रंगबिरंगी स्मृतिमण्यांचे खूप सर जमा झालेले आहेत..ती संदूक उघडली की इत:स्तत: पडलेले, एकमेकात गुंतलेले, काही चमकदार वज्रमण्यांचे, काही तेजस्वी रत्नांचे, काही रंगीत मोत्यांचे, काही काळवंडलेले, काही तुटलेले मणीहार, एकमेकात गुंतून पडलेले आहेत..त्या हारांमधला एकेक सर उचलावा आणि त्या मण्यातून विश्व आरपार दिसावं..युगानुयुगे घडत गेलेलं वास्तव सांगणारं..भारतातून निघून गेलेली लक्ष्मीची पावलं, नगरांच्या कहाण्या, सोन्या-हिऱ्यांच्या-खनिजांच्या खाणी, सुंदर वास्तूशिल्पाने नटलेली नगरं, शौर्य-पराक्रमाने झळाळून उठलेले वीर, हिंस्त्र श्वापदांनी भरलेली अरण्ये, बुद्धिवैभवाने नावाजलेले पंडित ऋषि-मुनि, कवि, लेखक, निरनिराळे भक्ति पंथ, संताच्या भक्तिमार्गाला मान्यता देणारा विशाल हृदयाचा हिंदू धर्म, यांच्यामुळे हा भारत घडत गेला..बहरत गेला आणि विश्वकीर्तीचा देश झाला..देशोदेशीचे साहसी, सप्तसिंधू ओलांडत या भूमीवर आले आणि सुखाने नांदू लागले..काही आक्रमक संदूकीतील रत्ने लुटून निघून गेले..युगानुयुगाने भरलेली काळाची संदूक भरत चालली..ती थोडी उघडली..त्यातील हे काही मणी-मोती-खडे..

Suhasdamle341@hotmail.com डॉ. स्मिता दामले.

महाशिवरात्र ८-३-२४

---

# अनुक्रमणिका.

१. पुष्पक विमान.

२. मगध ते बिहार.

३. चंद्रगुप्तपुत्र बिंदुसार.

४. मंदिरातील संपत्ति. मीर कासिम.

५. गझनीचा महंमद- जयपाल.

६. भीम मंदिराची लूट,

७. मथुरा.

८. सोमनाथ मंदिर.

९.शेवटचे परकीय.

१०.राज्ये-नगरे यांची नावे.

११.मयूर सिंहासन.

१२.हत्ती.

१३.सम्राट अकबर.

१४.बादशहा बहादूरशहा जफर

१५.चाफा बोलेना.

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—

# पुष्पक विमान.

भारतीय संस्कृतीतील सर्व ज्ञान श्रुती-स्मृती-पुराणांमधून पुढच्या पिढ्यांना गुरुमुखातून दिलं गेलं..ते पिढ्यान् पिढ्या जतन केलं गेलं. विद्यार्थ्याने जितकं ऐकलं आणि आपलं ज्ञान विस्तारलं तितका तो बहुश्रुत.. छापील कला आल्यानंतर युरोपियन भाषांमधे जे ज्ञान प्रसारित झालं आणि ज्याने ते जास्तीत जास्त घेतलं तो well read. हा दोन विरुध्द जगांमधला आणि भारतीय प्राचीन-पाश्चिमात्य अर्वाचीन ज्ञानामधला फरक..जेव्हा लिपी सुधारली तेव्हा ते ज्ञान आपल्याकडे लिखित स्वरूपात राहिलं..आपलं रामायण – महाभारत, देशभर भ्रमण करणाऱ्या ऋषि, मुनि, हरदासबुवा, कीर्तनकार, यांच्यामुळे देशभर पसरलं....

आपल्या पुराणकथांमधली एक अक्षय कीर्तीची व्यक्तिरेखा म्हणजे रावण याची कथा, भागवत पुराणात, बौध्द जातककथांमधे, वाल्मिकी रामायणात वेगवेगळी आहे..त्यातील एका रामायण कहाणीप्रमाणे, रावण हा दशानन म्हणजे दहा राज्यांचा तो मुखिया-आनन होता..त्याच्या पुष्पक विमानाबद्दलची एक कहाणी अशी आहे..ब्रह्माचा मानसपुत्र पुलस्त्य, पुलस्त्यचा मुलगा विश्रव..विश्रवाचा मुलगा वैश्रवण..वैश्रवण म्हणजेच कुबेर.

हा इंद्रदेवाचा खजिनदार होता..हा कुबेर आपल्या पणजोबांची सेवा करायला ब्रह्मदेवांकडे जाऊन राहिला..ब्रम्हदेवांनी वैश्रवणाच्या सेवेवर खूष होऊन त्याला लंकेचं राज्य, महाराजाधिराज पद, अमरत्त्व, पुष्पक विमान आणि लोकपालत्त्व भेट म्हणून दिलं..



विश्रवाच्या पुष्पोत्कटा बायकोला कुंभकर्ण आणि रावण, दुसऱ्या मालिनी या स्त्रीला विभीषण, आणि राका या तिसऱ्या स्त्रीपासून खर आणि शूर्पणखा एवढी मुलं झाली..(इथे कहाणीत जरा गडबड आहे..काही ठिकाणी रावण भावंड विश्रवाच्या एकाच कैकसी पत्नीची मुलं असल्याचा उल्लेख आहे.) मग सर्व गंधमादन पर्वतावर राहायला लागले..वैश्रवणाचं म्हणजे कुबेराचं

सगळं वैभव पाहिल्यावर रावणाने ब्रह्मदेवाची भक्ती करुन त्याला प्रसन्न करून घेतलं आणि देवांपासून अमरत्त्वाचा वर मागून घेतला. (देव लोकांचं हे एक बरं असतं, स्तुती केली की खूष आणि काय हवं ते माग म्हणणार, पण लगेच देणारही, हे वेगळेपण) मग दशाननाने त्याचा फायदा घेऊन, कुबेराचं सगळं वैभव लुटून पुष्पक विमान घेऊन त्याला हाकलून लावलं आणि स्वत: श्रीलंकेचा राजा बनला..पॉवर, पुष्पक आणि पद गेल्यामुळे संतापलेल्या कुबेराने स्वत:ची अलकानगरी स्थापन केली..

या कुबेराचा मुलगा नलकुबेर..या दशाननाने नलकुबेराच्या बायकोकडे दूषित नजरेने पाहिलं तेव्हा नलकुबेराने त्याला शाप दिला की तुझ्यावर प्रेम नसलेल्या परस्त्रीला हात लावलास की तुझा मृत्यू होईल..जो कुणी तुझा वध करेल तो हे पुष्पक विमान घेऊन जाईल..या शापामुळे सीता पवित्र राहिली आणि रामाला पुष्पक विमान मिळालं..बिचारी सीता..अग्निदिव्य करूनही एका परिटाच्या शंकेवर रामराज्यातील रामाने गर्भवती सीतेला वनवासात पाठवलं.. तेही जुळी मुलं होणार हे माहीत असूनही..

रावण नाव कसं पडलं त्याची पण एक कथा आहे..खूष झालेल्या ब्रह्मदेवाने जेव्हा दशाननाला देवांपासून अमरत्त्व दिलं, तेव्हा अंगात जोर चढलेल्या दशाननाने सरळ कैलास पर्वतालाच हात घातला आणि तो उचलण्याचा प्रयत्न केला तेव्हा कैलासावर बसलेले शंकर डगमगले आणि संतापले..आपल्याला त्रास देणारा कोण हे त्यांनी पाहिलं तेव्हा त्यांना दशानन दिसला..मग त्यांनी दशाननाचे हातच पर्वताखाली चिरडले..हात चिरडले गेल्यावर त्यावेळी दशानन किंचाळला..त्यामुळे त्याचं रावण पडलं..संस्कृतमधे

ऋ धातूचा अर्थ ओरडणे विव्हळणे असा आहे..थोडक्यात म्हणजे पॉवरफुल लोकांशी पंगा घेतल्याचा तो नतिजा होता..

देवांपासून अमरतत्व मिळालेल्या रावणाचा वध करण्यासाठी विष्णू हाही राम नावाने मनुष्यरुपात आला..कदाचित शंकराला रावणाला मारणं तो भक्त झाल्यामुळे अशक्य झालं असावं म्हणून विष्णूने ती जबाबदारी घेतली असावी..समुद्रात शिळा टाकून सेतु पार करणारा राम अयोध्येला परत जातांना मात्र पुष्पक विमानात बसून गेला..

आपल्या दक्षिणेतील राजांनी आजूबाजूच्या देशांवर फौजा पाठवल्या तेव्हा त्यांच्याकडून ऐकलेली रामायण कथा, आणि भारतभेटीला आलेल्या जवळपासच्या कंबोडिया वगैरे देशातील टुरिस्ट लोकांनी आपापल्या देशात या कथा नेल्या आणि तिथे राम-सीता-रावण कथा पसरवल्या..आता सिनेमे- नाटकं जातात, तेव्हा कथा गेल्या..

ही जुन्या काळी प्रचलित असलेली रावण कथा आहे..आता भांडारकर संस्थेने, रामायणाच्या सर्व प्रतींचा अभ्यास केल्यानंतर, संशोधनानंतर तयार झालेल्या प्रतीत खरी कहाणी असेल..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# मगध ते बिहार.

आज बिहार नावाने प्रसिद्ध असलेल्या राज्याचा प्राचीन इतिहास फार श्रीमंत आहे..मगध देश हा महाभारतातील जरासंघाचा देश..पाटलीपुत्र ही तिथली राजधानी..इथे अनेक अपूर्व घटना घडल्या..इथेच वैदिक हिंदू धर्माला, त्यातील समाज व्यवस्थेला, श्रद्धांना आव्हान देणाऱ्या बौद्ध पंथाचा उदय झाला..जगतगुरू गौतम बुद्धांचा जन्म ही अपूर्व घटना घडली.

श्रीक्षेत्र काशीच्या ईशान्येस १०० मैलांवर, रोहिणी नदीच्या काठावर कपिलवस्तू नगरी होती..तिथे शुद्धोदन नावाचा, शूर, न्यायी, प्रजापालन दक्ष राजा राज्य करत होता..शेजारी कोसल, मगध ही बलाढ्य राज्ये असूनही तो स्वतंत्र होता..रोहिणी नदीच्या दुसऱ्या तीरावर कोलियन नावाचा क्षत्रिय वंशाचा अंजन नावाचा राजा राज्य करत होता..त्याच्या दोन कन्या, मायावती आणि प्रजापती गौतमी यांच्याशी शुद्धोधनाने विवाह केला..पण खूप वर्षे त्या दोघींना संतान झालं नाही..शेवटी वयाच्या ४५ व्या वर्षी मायावती गर्भवती झाली..ही राणी परिवार घेऊन बाळंतपणासाठी माहेरी जात असतांना वाटेत लुंबिनी या गावी तिला प्रसूती वेदना सुरू झाल्या..आणि तिथेच तिला पुत्र झाला..शुद्धोदन आपल्या बाळाला बघायला आला आणि त्याने आनंदाने पुत्रोत्सव साजरा

केला..बाळाचं नाव सिद्धार्थ ठेवलं..सिद्धार्थाच्या जन्मानंतर ७ वे दिवशी मायावती निधन पावली.. त्यानंतर सिद्धार्थाचा सांभाळ प्रजापती गौतमीने केला..बालवयापासूनच सिद्धार्थाचा कल चिंतनाकडे आणि पाहिलेल्या घटनेचं मनन करण्याकडे होता..त्याच्या चुलत भावाने बाणाने मारलेला जखमी हंस पाहून सिद्धार्थ

व्याकूळ झाला..त्याने तो बाण काढून त्या हंसाला बरं केलं पण हंसाच्या वेदना त्याच्या मनात कायमच्या रुतल्या..या सतत चिंतनात बुडून गेलेल्या आपल्या पुत्राला त्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी शुद्धोधनाने त्याचा विवाह सुप्रबुद्ध राजाच्या कन्येशी लावून दिला..मग मात्र सिद्धार्थ संसारात रमला..त्याला एक पुत्र झाला, त्याचं नाव राहूल ठेवलं..

जेव्हा मृत शरीर, रोगग्रस्त शरीर आणि वृद्ध शरीराचं दर्शन झालं तेव्हा तरुण सिद्धार्थला या नश्वर जगाच्या दु:खाची ओळख झाली आणि त्याचं मन विचारात बुडून गेलं..त्यातच एक दिवस त्याला एक यती भेटला आणि त्याने जनन मरणाच्या पार जाण्याचा तपश्चर्येचा मार्ग सांगितला. तेव्हा ऐहिक सुख, पत्नी, पुत्र, व सर्व विलासी प्रपंचाचा त्याग करून, इ. पूर्व ५९२ मध्ये म्हणजे वयाच्या ३० व्या वर्षी. सिद्धार्थ सत्याच्या शोधात निघालला..तपोवनात शिरून दु:खाचं मूळ शोधण्यावर चिंतन केलं..आजवर जे जे दु:ख समाजात हिंडतांना दिसलं त्यावर त्यांनी चिंतन करून, दु:खाच्या मूळ कारणावरील आपले विचार निश्चित केले..

अशी ४ वर्षे गेली..मग त्या ४ वर्षांच्या सततच्या चिंतनातून त्यांनी जे विचार मांडले त्यातून बौद्ध पंथ इ. पू. ५८८ मध्ये उदयाला आला..ऊरुवेला इथे निरंजना नदीच्या काठावर, पिंपळाच्या वृक्षाखाली, जे तत्वज्ञान-बोधि-त्यांना प्राप्त झालं, त्यानंतर त्यांना बुद्ध नावाने ओळखलं जाऊ लागलं..वस्तूमानाचं वास्तव रूप जाणणारे म्हणून तथागत आणि अर्हत्त हीसुद्धा उपाधी मिळाली..आपला संदेश समाजासमोर मांडायला ते भ्रमण करू लागले..वाराणसीजवळ सारनाथ येथे, त्यांनी आपला पहिला

उपदेश दिला..हा दिवस धम्मचक्रपरिवर्तन म्हणून ओळखला जातो..आपल्या प्रवचनात, सारं आयुष्य हे दु:खाने भरलेलं आहे असं सांगून, दु:खाची कारणे आणि दु:खापासून मुक्तता यावर त्यांनी मार्गदर्शन सुरू केलं..आत्मोन्नती आणि मनोनिग्रह ही त्यांच्या विचारांची मूलतत्त्वे होती..

गौतम बुद्ध हे स्वत:च्या विचारांचा स्वत:च प्रसार करत हिंडण्याचा पाया घालणारे पहिले धर्मप्रसारक..त्यांनी आपल्या अनुयायांचे दोन वर्ग निर्माण केले..एक, देशोदेशी जाऊन प्रसार करणारे आणि दुसरे उपदेशक..

आपल्या निरुपणातून त्यांनी वैदिक धर्माच्या प्रस्थापित रुढींवरच हल्ला चढवला हे त्यांचं मोठचं धाडस होतं..आपल्या प्रवचनातून हिंदुस्थानातील पुरोहित वर्गाचं जे प्रचंड स्तोम माजलं होतं, तेच त्यांनी कमजोर करून टाकलं..जातीभेदाच्या जंजाळात माणूस फक्त अपमानांनी जगत होता, त्यावर प्रहार केला..अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणे ही अनीति आहे याचा जोरदार प्रचार केला..आजवर या प्रथेला कुणी अनीति समजलं नव्हतं..एवढंच नव्हे तर पत्नी

ही सहचारिणी आहे, पुरुषाची मालमत्ता नाही आणि कामासाठी राबणारी, ओझी वाहणारी दासी नाही हा त्यांचा विचार समाज व्यवस्थेत क्रांती करणारा होता..यज्ञयागात पशुबळी करणं आणि राज्याविस्ताराची हाव हे पाप आहे, मांसाहार हा निषिद्ध आहे, हे त्यांचे विचार समाजाला धक्का देणारे होते..वडील माणसे सांगतात म्हणून ती योग्यच असं मानू नका, स्वतःच्या विचाराने योग्य अयोग्य ठरवा हा त्यांचा उपदेश कौटुंबिक शिस्तीवर प्रहार करणारा होता..त्यांनी सत्य, प्रेम, अहिंसेचा विचार मांडून नवीन मार्ग लोकांना दाखवला..हा विचारच त्याकाळी

क्रांतिकारक होता..तोपर्यंत भारतात राज्यं, लढाया, मृत्यू, पशुबली, ईश्वर, वर्णभेद, उच्च नीच भेद या विश्वासांनी समाज वेढलेला होता..अहिंसेच्या मार्गाने दु:ख निवारण ही कल्पनाच समाजाला नवीन होती..त्यामुळे सामान्य आणि ज्ञानी, दोन्ही वर्ग अचंबित झाले..आपल्या प्रवचनातून त्यांनी वेगळेच विचार मांडले..ज्या भारत देशात जप, पूजा, अशा कर्मकांडाचा दु:ख निवारणासाठी मार्ग होता त्या काळात, गौतम बुद्ध यांनी आपले ४ विचार मांडले. ते म्हणजे १. हा संसार दु:खाने भरलेला आहे..२. इच्छा ही दु:खाला कारण आहे..३. इच्छेवर विजय मिळवून हे दु:ख निवारण करणे शक्य आहे..४. करुणा, निर्धार, योग्य कर्म, सन्मानाने उपजीविका, वाईट विचारांचा लगेच नाश करणे, अशा अष्टांगिक मार्गाने मन:शांति मिळू शकते.

हे त्यांचं चिंतन आजवरच्या सांप्रदायिक समाजाला फारच वेगळं होतं.. जगात ईश्वर नाही आणि ईश्वराला शरण न जाताही संकट विमोचन होऊ शकतं, हा विचारही भाबड्या पापभीरू लोकांना नवीन होता..सुख देखील क्षणिक

असतं आणि म्हणूनच तेच दु:खाला कारण असतं हा त्यांचा आयुष्यावर केलेला नवीन विचार होता..दु:ख निरोध म्हणजेच निर्वाण हा त्यांच्या उपदेशाचं सार दाखवणारा शब्द आहे..सारी सृष्टी ही उत्पत्ति आणि विलय या सूत्राने बनते, आणि ती परिवर्तनशील आहे, या सूत्राचा विचार मांडून, ब्रह्मा-विष्णू- महेश यांना सृष्टीचे विधाते मानणाऱ्या युगानुयुगांच्या विश्वासाला या निरीश्वरवादामुळे पूर्ण तडा गेला.

त्यांनी आपल्या शिष्यांना आत्मनिर्भर होण्याचा उपदेश केला..आत्मदीप म्हणजे तुमचा प्रकाश तुम्हीच शोधा असा मार्ग दाखवला

त्यामुळे ज्यांना हिंसेचा, युद्ध, लढाया, नरसंहार, रक्तपात, सत्तेचा हव्यास, यांचा तिटकारा होता, जे शाकाहारी होते, ते आपोआप गौतम बुद्धाचे अनुयायी बनले..त्यांची लिखित प्रवचनं नसल्यामुळे त्यांचे भिख्खू अनुयायी त्यांच्या विचारांचा प्रसार स्वत:च्याच शब्दात करायला लागले..गौतमबुद्ध जेव्हा आपल्या वडिलांना भेटायला गेले तेव्हा त्यांनी आपला पुत्र राहूलला बघितलं आणि त्याला आपल्या विचारांची दीक्षा दिली..आपल्या राज्याचा वारस असा अहिंसेच्या मार्गाने गेलेला पाहून, व्यथित झालेले शुद्धोधन गौतम बुद्धांना म्हणाले की यापुढे आई वडिलांची संमती घेतल्याशिवाय कोणत्याही तरुणाला तुझ्या धर्मात घेऊ नकोस..गौतमाने ते मान्य केलं..

शुद्धोधंनाच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी यशोधरा, मावशी गौतमी आणि पुत्र राहूल त्यांच्याबरोबर निघाले..या बौद्ध तत्वज्ञानाचा वेगाने प्रसार झाला..पुढे त्या तत्त्वज्ञानाच्याही मूळ हीनयान जो गौतम बुद्धांचा विचार पुढे नेणारा आणि

विकसित झालेला महायान या दोन शाखा झाल्या..गौतम बुद्धांचा उपदेश, बौद्ध वाङ्मय, पाली भाषेत संग्रहीत होतं..प्रत्येक अनुयायाला बुद्धं शरणमं गच्छामि, धम्मम शरणम गच्छामि, संघम शरणं गच्छामि या व्रताचा अंगीकार करणं आवश्यक होतं..गौतम बुद्धांचा मृत्यू कुशीनगर इथे इ. पू. ५४३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी झाला..

गौतम बुद्धांच्या महानिर्वाणानंतर, मगधाचा सम्राट अशोकाचा जन्म, मौर्य राजघराण्यात, इ. स. पूर्व ३०४ मध्ये पाटलीपुत्र इथे झाला..त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर, या भक्तीमार्गाला धर्माचं व्यापक अधिष्ठान लाभलं..सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांनाही धर्मप्रसारासाठी श्रीलंकेत पाठवलं..सम्राट अशोकाच्या प्रेरणेने, गौतम बुद्धांचा विचार घेऊन त्यांचे शेकडो अनुयायी आग्नेय आशिया आणि मध्य आशियात सर्वत्र हिंडू लागले, तेव्हा त्यांच्या वसतीसाठी सम्राट अशोकाने भारतभर, हजारो विहारांची आणि स्तूपांची निर्मिती केली.. चीन देशात बौद्ध धर्माचा मोठा प्रसार झाला..

एक गोष्ट इथे लक्षात ठेवली पाहिजे की कलिंगच्या विजयी युद्धानंतर झालेल्या १ लाख जीवांच्या मृत्यूने, त्या नरसंहाराला विटल्यामुळे, सम्राट अशोकाने शांती, अहिंसा आणि आत्मशोधाचा बौद्ध धर्म स्वीकारला पण शेवटी तो योद्धा सम्राट होता..कलिंग देश आपल्या साम्राज्याला जोडण्याची आपल्या पूर्वजांची अधुरी राहिलेली पूर्ण केल्यावरच त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला..**या धर्मप्रसारक बौद्ध भिख्खूंच्या विहारांची मगध देशात एवढी प्रचंड संख्या होती की मगधलाच लोकांनी विहार म्हणायला**

**सुरुवात केली..तेच आजचं बिहार..मगध, विहार ते बिहार अशी ही ओळख आहे.**

.त्याच काळात जैन धर्माचा उदय होऊन हिंदू धर्माची खूप पिछेहाट झाली..जैन धर्मातही अहिंसा, निरीश्वर या तत्त्वज्ञानाचा भर होता..जैन धर्मातील २४ तीर्थंकरांपैकी महावीर यांच्या काळात जैन धर्म वेगाने पसरला..कालांतराने जेव्हा बौद्ध आणि जैन धर्माच्या वाढत्या प्रसारामुळे हिंदू धर्माच्या अवनतीचा काल आला तेव्हा हिंदू धर्माच्या उत्थापनाचं कार्य आदि शंकराचार्यांनी केलं..त्यांनी भारतभर प्रसार आणि प्रचार करून, कालिकामठ द्वारकेचा, गोवर्धनमठ जगन्नाथपुरीचा, ज्योतिर्पीठ बद्रिनाथचा, शारदापीठ शृंगेरीचा, या भारताच्या चार दिशांना मठांची स्थापना करून मठाधिपती नेमले..तेच आजचे चार मठांचे शंकराचार्य..मांसाहाराच्या विरुद्ध होऊन बौद्ध धर्माकडे आकर्षित होतो आहे हे पाहून हा प्रवाह थोपवण्यासाठी, ब्राह्मणांनी मांसाहार वर्ज्य करून शाकाहार स्वीकारला..हिंदू धर्माच्या विशाल तत्त्वज्ञानामुळे त्यात सर्व विचारांना स्वातंत्र्य, सन्मान आणि मान्यताही आहे पण त्यामुळेच त्यात, अनेक धर्म, पंथ, द्वैत-अद्वैत अशी अनेक विचारांची जाळी हा दोषही आला..

**गौतम बुद्ध, सम्राट अशोक, बौद्ध धर्माचं उदयस्थान हा, बिहारचा दैदीप्यमान भूतकाळ आहे..**

**ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss.**

# चंद्रगुप्तपुत्र बिंदुसार.

मगध हे उत्तर भारतातील, अतिप्राचीन १६ जानपदांपैकी एक महत्त्वाचं समृध्द साम्राज्य..कांबोज, गांधार, कुरु, पांचाल, मत्स्य, मगध, अंग, चेदि, कोसला, काशी, शूरसेन, मल्ल, व्रज, ही गणराज्यं होती..इथे राजेशाही असली तरी लोकशाही होती हे महत्त्वाचं..महाभारतातील जरासंधामुळे मगधाचं नाव सर्वतोमुखी झालं..याच मगध देशात इ. पू. शतकांमधे प्रद्योत वंश, बिंबीसाराचा हर्यक वंश, शिशुनाग वंश, महापद्माचा नंद वंश ही राजघराणी झाली..त्या वंशातील धनानंदाचा नाश करुन चंद्रगुप्त मौर्य गादीवर आला.

चंद्रगुप्ताचा जन्म इ. पू. ३५० मध्ये झाला..तो इ. स. पूर्व ३२१ सालामध्ये मगधाच्या गादीवर बसला..चंद्रगुप्त हा मुरा नावाच्या स्त्रीचा मुलगा, म्हणून हे घराणं मौर्य नाव लावू लागलं..धनानंदाच्या दरबारातून अपमान झालेला चाणक्य, धनानंदाला गादीवरून उतरवल्याशिवाय आपल्या शेंडीची गाठ बांधणार नाही अशी प्रतिज्ञा करून बाहेर पडला..एकदा मार्गातून जात असतांना त्याला चंद्रगुप्त नावाचा एक लहान मुलगा राजा, आणि त्याचे मित्र प्रजा, असा खेळ चालू असलेला त्याने पहिला. त्या मुलाच्या आईने हा मुलगा धनानंदाचा मुलगा आहे, असं सांगितलं, तेव्हा त्या मुलाला हाताशी धरून चाणक्याने

धनानंदाचा शेवट केला आणि चंद्रगुप्ताला गादीवर बसवलं..धनानंदाने या बायकोला हाकलून लावलं होतं म्हणून ती विजनवासात राहत होती..



चंद्रगुप्ताला दोन राण्या होत्या..त्याच्या पट्टराणीचं नाव दुर्धरा होतं. ती चंद्रगुप्ताची मामेबहीण होती..दुसरी राणी हेलेना ही तेव्हाचा ग्रीक राजा सेल्युलसची कन्या होती..

चंद्रगुप्ताने आपल्या पराक्रमाने साम्राज्य निर्माण केलं. चाणक्य त्याचा कारभार पहात होता..चंद्रगुप्ताला कुणीही शत्रूंनी विष दिलं तरी त्याला मरण येऊ नये म्हणून आर्य चाणक्य रोज त्याच्या जेवणातून त्याला कणभर विष देत असे..पण सम्राट चंद्रगुप्ताला याची जराही कल्पना नव्हती..चंद्रगुप्ताच्या शरीराला त्या विषाची सवय झाली होती..

चंद्रगुप्ताच्या गर्भवती दुर्धरा राणीचे नऊ महिने भरले होते, आणि ती कधीही प्रसूत होईल याची सर्वजण वाट पाहात होते..एक दिवस चंद्रगुप्त आणि त्याची राणी एकत्र जेवत बसले होते..त्यावेळी चंद्रगुप्ताने मोठ्या प्रेमाने आपल्या राणीला आपल्या ताटातला घास भरवला..योगायोगाने चंद्रगुप्ताला भेटायला चाणक्य त्याच क्षणी काही कामासाठी तिथे आला आणि त्याने ते पाहिलं. त्याबरोबर चाणक्याने ताबडतोब आपल्या राजवैद्यांना बोलावून राणीचं पोट कापलं आणि त्यातून बाळ बाहेर काढलं. राणी त्या क्षणी मरण पावली..पण त्या विषाचा जहरीपणा एवढा होता की त्या बाळाच्या रक्तात क्षणात विष भिनलं आणि त्याच्या कपाळावर बिंदूएवढा नीळा डाग उठला, म्हणून त्याचं नाव बिंदुसार पडलं...असा होता चाणक्य..राजाचं रक्षण म्हणजे राष्ट्राचं रक्षण करणारा…

चंद्रगुप्ताने जैन धर्म स्वीकारला..आयुष्याच्या अखेरीला तो कर्नाटकात जाऊन राहिला..तिथे त्याने, हसन इथे एका डोंगरातूनच ५७ फूट उंचीची, जैन धर्माचे पहिले तीर्थंकार ऋषभनाथांचा पुत्र, बाहुबलीची अखंड मूर्ती निर्माण केली..ही श्रावणबेळगोळाची भव्य मूर्ती एक आश्चर्य आहे. चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार हा सम्राट बनला..या बिंदुसाराच्या मुलाचं नाव अशोक..हा

पुत्र भारताच्या इतिहासात अक्षय कीर्तीचा झाला.. त्याचं नाव अशोक का ठेवलं गेलं त्याची एक कहाणी आहे..अशोक म्हणजे शोक जाणे, आनंद येणे. त्याला कारण घडलं ते अगदी क्षुल्लक होतं..सम्राट बिंदुसा राच्या सेवेत असणारी, त्याचे केस कापणारी दासी - तिच्या कामात अत्यंत कुशल होती..तिने एकदा सम्राट बिंदुसाराचे केस इतके सुंदर कापले की सम्राट खूष झाला..त्याने त्या सेविकेला बक्षिस माग म्हटलं, तेव्हा त्या सेवेचं बक्षिस म्हणून त्या दासीने राजाबरोबर एक रात्र घालवण्याचं बक्षिस मागितलं..तेव्हा सम्राट बिंदुसार रागावला आणि तिला म्हणाला, की मी एक क्षत्रिय, तू नाभिक जातीची, आपला समागम कसा होईल..? तेव्हा त्या दासीने, आपल्या पोटी एक चक्रवर्ती जन्मणार असल्याचं भविष्य आपल्या गुरूने आपल्याला सांगितलं असल्याचं सम्राट बिंदुसाराला सांगितलं..तिने असं म्हटल्यावर, बिंदुसार तिच्या बरोबर रात्र घालवायला तयार झाला..त्यानंतर त्या स्त्रीला बिंदुसारापासून मुलगा झाला तोच हा अशोक..अशोकाच्या जन्मानंतर बिंदुसाराने तिला आपली रक्षिता म्हणून राजप्रासादात ठेवलं..तिची राजप्रासादातील उच्च स्थानावर नेमणूक झाली, म्हणून तिचा शोक संपला..म्हणून त्या पुत्राचं नाव तिने अ-शोक ठेवलं. तिला जो दुसरा मुलगा झाला तो वीतशोक..हा अशोक भारतीय इतिहासात खरोखरच अद्वितीय सम्राट बनला..वडील चंद्रगुप्त आणि पुत्र अशोक मिळालेला बिंदुसार जास्त भाग्यवान...

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss--.

# मंदिरातील संपत्ती.

# मीर कासीम.

सिंध प्रांत हा विशाल भरतखंडातील, महाभारतातील जयद्रथाचा हा देश..भारतात जेव्हा हिंदुस्थानात सन ६५० मध्ये, चक्रवर्ती हर्षवर्धन राज्य करत होता, तेव्हा इ.सनाच्या ७ व्या शतकात, सिंधमद्धे साहसीराय नावाचा हिंदू राजा राज्य करत होता..हा साहसीराय निपुत्रिक मरण पावला, तेव्हा त्याचा मंत्री चच याने सिंहासन काबिज केलं आणि साहसीरायच्या विधवेशी विवाह केला..चचाच्या मृत्यूनंतर, सन ६७९ सालात दाहिर हा त्याचा मुलगा सिंधच्या गादीवर आला..

त्याकाळात अरब, अफगाणी व्यापारी लोक हिमालयातून वाट न काढता, सिंधू नदी जिथे समुद्राला मिळते, तिथून वाळवंटाच्या मार्गाने भारतात येत..पण अरबांनी इराण जिंकल्यावर तिथे त्यांना तळ ठोकण्यास जागा झाली..त्याकाळात इस्लाम धर्माचा प्रसार वेगाने होत होता..त्याचा प्रसार सिलोनपर्यंत झाला होता..बगदादमध्ये तेव्हा खलीफ वालीद सत्तेत होता..त्याला भेटायला काही मुसलमान यात्रेकरू सिलोनहून निघाले होते..त्यांचं जहाज सिंधु नदीतून जात असतांना वादळामुळे भरकटलं आणि दाहिरच्या सिंध राज्यातील देबाल बंदराला लागलं..या मुसलमान यात्रेकरूंवर

देबालमधील दरोडेखोरांनी हल्ला केला आणि त्यांना लुटलं..तेव्हा इराणच्या सुभेदाराने त्या दरोडेखोरांना शिक्षा करण्याचा खलिता दाहीरला पाठवला..त्यावर दाहीरने ते दरोडेखोर माझ्या काबूत नाहीत असा उलटा निरोप पाठवला..दाहिरने त्यांचा बंदोबस्त केला नाही एवढ्या निमित्तावरून इराणच्या खलिफाने आपला भाचा मीर कासीम याला सिंध जिंकायला पाठवलं..आपलं युद्धसाहित्य जहाजातून पाठवून मीर कासीम फौज घेऊन मीर कासीम राजधानी देबालवर चालून आला.

देबाल शहरात एक मंदिर होतं, त्याच्यावरील ध्वजाला जोपर्यंत धक्का



लागत नाही, तोपर्यंत देबालला धोका नाही अशी तिथल्या लोकांची श्रद्धा होती..मीर कासीमला हे कळल्यावर त्याने आपली भडिमार- catapults यंत्रे त्या मंदिरावर चालवली आणि दगडांचा मारा करून ध्वज खाली पाडला. त्याबरोबर तिथल्या नागरिकांचं आणि दाहीरच्या फौजेचं मानसिक खच्चीकरण झालं..आजवर देबाळवर अनेक हल्ले होऊनही देबालच कायम जिंकलं होतं, म्हणून दाहीरने या आक्रमणाची फार तयारी केली नव्हती..

दाहीर आणि मीर कासीममध्ये युद्धं सुरू झालं..दोन्हीकडील सेना शूर आणि पराक्रमी होत्या..दाहीर काटेरी तार गुंडाळलेल्या हत्तीवर बसला होता..पण दाहीर युद्ध हरला..सिंध हा हिंदू राष्ट्रातील मुसलमानांच्या हाती पडलेला पहिला अखंड हिंदुस्तानचा पहिला बळी. दाहीरच्या स्त्रियांनी जोहार केला तो कदाचित पहिला जोहार..मीर कासीमला या स्वारीत अफाट संपत्ती मिळाली. इ. स. ७१२ मधे रमझानच्या १० व्या दिवशी भारत उपखंडातील सिंधू संस्कृतीचा सिंध हा एक अवयव तुटला.

मीर कासीमने या विजयानंतर इतर राज्यांवर स्वारी करून अमाप लूट आपल्या देशात नेली..पण भारतातील देवालयांमध्येही भाविकांनी ठेवलेली अगणित संपत्ति होती..भारतातील लहान छोट्या देवळांमधे किती संपत्ती होती त्याचं एक उदाहरण म्हणजे मुलतान काबीज केल्यावर महंमद कासीमने एक मंदिर लुटलं..त्या देवळाच्या आवारात आणखी एक लहान देऊळ होतं..त्यात सोन्याच्या नाण्यांनी भरलेल्या तांब्यांच्या ४० हंड्यावर एक पूर्ण पुरुषाची उंची असलेली निखळ सोन्याची मूर्ती होती..तिचे डोळे भारी किंमतीच्या माणकांचे होते. तिचं वजन २३० मण होतं..आणि खाली जे ४० हंडे होते त्यात १३२० मण सोन्याची नाणी होती..बाहेरच्या जगाला भारतातील श्रीमंतीची पहिली ओळख झाली..

मीर कासीमचा विजय कशामुळे झाला..? राजा दाहीरही शूर होता.. त्याच्याकडे कृष्णाच्या सुदर्शन चक्राप्रमाणेच एक विलक्षण चक्र होतं, दाहीर ज्याच्यावर ते चक्र फेकेल त्याचं मुंडकं धडावेगळं होई..पण केवळ आणि केवळ दुर्दैव आणि नियतीचं दाहीरच्या नाशाला कारण ठरली..दाहीर ज्या प्रचंड

हत्तीवर अंबारीत बसला होता, त्या अंबारीवर एका अरबाचा जळता बाण येऊन पडला..हत्ती भाजायला लागला आणि सैरावैरा धावत तळ्यावर जाऊन पाण्यात शिरला..दाहीर अंबारीतून पाण्यात पडला..तेव्हा मीर कासीमच्या फौजेने दाहीरला ठार केलं..

आणि उलट मीर कासीमकडे शत्रूच्या इमारतींवर तडाखा करणारी भडिमार-कॅटापल्ट यंत्रे घेऊन, मीर कासीम आला..दाहीरकडे अशी अत्याधुनिक सुसज्ज शस्त्रास्त्रे नव्हती..दुसरा भारतीयांचा मोठा दुर्गुण म्हणजे राष्ट्राभिमानाचा अभाव, आणि फितुरी स्वभाव..राजा दाहिरचा बेट प्रांताचा अधिकारी, बसैया, बेट प्रांताचा मालक होण्यासाठी विकला गेला आणि त्याने सिंधू नदी ओलांडण्यासाठी मीर कासीमला नावांची मदत केली. उलट दाहीरकडील अफगाणी फौजेने आपल्या धर्मबांधवांविरूध्द लढायला

नकार दिला. मीर कासीमने अनेक स्त्री-पुरुषांना कैद केलं. त्यांना त्यांच्या देशात दास दासी म्हणून जनानखान्यात वापरलं गेलं..हिंदू मुसलमान DNA तेव्हापासून बदलायला लागला..मीरने इतर राज्यांच्या स्वारीतून प्रचंड लूट स्वदेशात नेली..

तेव्हापासून सिंध मुसलमानांचा झाला..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# गझनीचा महंमद - जयपाल

कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील अस्तराबाद या गावी सन १५७० मध्ये जन्मलेला महंमद कासिम हा भारतात अहमदनगरला निजामशाहीत वाढला..त्याच्या वडिलांना, गुलामअली हिंदुशहा यांना निजामशहाने आपल्या मुलांना पर्शियन शिकवण्यासाठी बोलावून घेतल्यावर कुटुंबासह ते अहमदनगरला आले..महंमद कासिमचे वडील लवकरच वारले..त्यांच्या जागी, महंमदची निजाम दरबारातील जागा कायम झाली. काही काळ तो विजापूर दरबारातही होता..या महंमद कासीमने सर्व भारतीय सुलतानांचा इतिहास फेरिश्ता नावाने लिहून ठेवला आणि नंतर इंग्रजांच्या काळात, मद्रास आर्मीमधल्या कर्नल जॉन ब्रिग्गज् नावाच्या सेनाधिकाऱ्याने त्याचं, History of Rise of The Mohamedan Power in India हे भाषांतर करून तो इतिहास जगासमोर आणला..

ज्या सिंधु नदीच्या आश्रयाने मानवी संस्कृती बहरली, त्या सिंधूंचा प्रदेश म्हणजे सप्तनद्यांचा प्रदेश..सिंधू, चिनाब, रावी, सतलज, झेलम या प्रसिद्ध महानद्या, कुभा म्हणजे आताची काबूल नदी, आणि कृमा म्हणजे आताची कुर्रम नदी अशा सप्त नद्यांचा प्रदेश जो हिंदुकुशापर्यंत पसरला होता..इथे सर्वत्र हिंदूंचं राज्य होतं.

गझनी हे असंच एक इतिहासप्रसिद्ध नाव..या गझनीचा अमीर म्हणजे सुलतान आलप्तगिन याने एक मुलगा गुलामांच्या बाजारातून विकत घेतला..त्याचं नाव होतं सुबक्तगिन..या मुलाच्या हुशारीवर अमीर खूष झाला

आणि त्याने सुबक्तगिनकडे मोठ्या मोठ्या जबाबदाऱ्या सोपवायला सुरुवात केली..आलप्तगिनच्या मुलीशी त्याने विवाह केला..जेव्हा आलप्तगिन सन ९७५ मध्ये मरण पावला तेव्हा सर्व अधिकाऱ्यांनी सुबक्तगिनला सुलतान बनवलं..अशातऱ्हेने इ.स. ९७७ सालात सुबक्तगिन गझनीचा प्रमुख बनला..सुबक्तगिनने त्यानंतर सत्ता विस्तारासाठी भारतावर आक्रमण करायला सुरुवात केली..

त्याकाळी काश्मीर ते मुलतान आणि सरहिंद ते लामघन (आताचं जलालाबाद) पर्यन्तच्या प्रदेशात हतपाल नावाच्या हिंदू राजाचा पुत्र जयपाल राज्य करत होता..गझनीचा सुबक्तगिन आपल्यावर आक्रमण करणार हे कळल्याबरोबर जयपालने आपली चतुरंग सेना आणखी बळकट केली.. काबूलच्या खोऱ्यात लढाईचा तळ पडला..इतर राजेही प्रचंड फौज घेऊन त्याच्या मदतीला आले, पण जयपालाचा पराभव झाला तेव्हा जयपालाने वकील पाठवून ५० हत्ती, २ लाख दीनार भेट म्हणून स्वीकारून सुबक्तगिनला युद्ध थांबवण्याची विनंती केली..यात एक दीनार म्हणजे ४ दिर्हम..सोन्याच्या नाण्याला दीनार म्हणत आणि चांदीच्या नाण्याला दिर्ह्म म्हणत..सुबक्तगिनने ते मान्य केलं पण बापाबरोबर लढाईला आलेल्या त्याच्या मुलाला, महंमदला ते आवडलं नाही..

फेरीश्ताने या पराभवाचा एक वेगळाच उल्लेख केला आहे..तो लिहितो की जयपालाच्या एका भागात बर्फवृष्टी सुरू झाली होती..तेव्हा महंमदला सल्ला मिळाला की छावणीतील सर्व हजारो सैनिकांची विष्ठा, गुरांचं शेण, गोळा करून आकाशात फेकायचं..महंमदने तसंच केलं, त्याबरोबर त्या

भागात जोरदार पाऊस, गार झोंबरे वारे, सुरू झालं. जयपालाच्या तळावरचे खूप सैनिक वाहून गेले..( या प्रकराने जर हवामान बदलता येत होतं, तर सूर्याला लपवणं आणि मोकळं करण्यासाठी कृष्णाने जयद्रथासाठी युद्धभूमीवर असाच काही उपाय केला असेल का..? ते राजेही काबूल-गांधारचेच होते..) थोडे अफगाणीही मेले..त्या नाशामुळे जयपाल शरण आला..त्यातली काही रक्कम त्याने तिथेच दिली आणि उरलेल्या खंडणीसाठी दोन वकील लाहोरला नेण्याची परवानगी मागितली..सुबक्तगिनने ते कबूल केलं आणि आपले आपले दोन वकील त्याच्याकडे पाठवले..पण लाहोरला गेल्यावर जयपालाने अफगाणी वकिलांना कैद केलं आणि ठरलेली खंडणीही दिली नाही, तेव्हा संतापलेला सुबक्तगिन परत जयपालावर चालून आला..जयपाल आणि सुबक्तगीन यांच्यात घनघोर लढाई झाली..जयपालाचा पूर्ण पराभव झाला..सुबक्तगिनही गझनीत पोचल्यावर मरण पावला..

या सुबक्तगिनाला शिकारीचा खूप नाद होता. एकदा शिकारीला गेला असतांना त्याने एक हरिणी आणि तिचं पाडस पाहिलं..सुबक्तगीनने त्या पाडसाला आपल्याबरोबर घेतलं..काही वेळाने त्याने मागे वळून पहिलं तर ती हरिणी त्याच्या पाठोपाठ येत होती..सुबक्तगीनला खूप दया आली..त्याने पाडसाला मोकळं केलं..नंतर ती हरिणी कृतज्ञता म्हणून वरचेवर मागे वळून त्याचाकडे पाहत होती..त्या रात्री सुबक्तगीनला स्वप्न पडलं की त्याच्या या दयाळूपणावर ईश्वर प्रसन्न झाला आहे, आणि बक्षिस म्हणून गझनीचं राज्य त्याला मिळालं आहे..

या सुबक्तगिनाचा पुत्र महंमद, गझनीचा महंमद हे नाव सर्व

भारतीयांना खूप माहीत आहे..सुबक्तगीनच्या मरणानंतर, सन १००१ मधे, गझनीची गादी हाती आल्याबरोबर त्याची पहिली स्वारी लाहोरचा राजा जयपालवर झाली..पेशावरला दोन्ही सैन्यांची गाठ पडली..यात जयपालाचा पराभव झाला..त्यात त्याचे भाऊबंद, १५ मोठे सरदार, मुलगे कैद झाले..मागच्या करारात ठरलेले ५० हत्ती आणि २ लाख दीनार घेऊन जयपालला महंमदने कैदेतून मुक्त केलं.

या विजयानंतर किती संपत्ती मिळाली महंमदला? ३०० देखणे धिप्पाड हत्ती, १०,००० उत्कृष्ट घोडे, सोनं, रुपं, हिरे अशी अति मौल्यवान रत्नं मिळाली..जयपालकडे बहुमोल रत्नांच्या १७ लांबलांब माळा होत्या..त्यातील एका माळेची किंमत सन १००१ साली, १,१८,००० दीनार एवढी होती..आता दीनारची किंमत २६८ रुपये आहे. म्हणजे त्याकाळातील त्या एका माळेची किंमत आज काय होईल.?

हिंदू रिवाजांप्रमाणे राजाचा दोनदा पराभव झाला की त्याला सिंहासन सोडावं लागे..त्याप्रमाणे बेडर, पराक्रमी, मानी, जयपालाने आपला पुत्र आनंदपालाच्या मस्तकावर मुकुट ठेवला आणि अग्निप्रवेश करून स्वत:ला संपवलं..गझनीच्या महंमदने मिळवलेला हा पहिला विजय आणि ही मोठी दौलत..इ. स. १००१ पासून १०२४ सालापर्यंत..त्यानंतर तो १७ वेळा आला आणि भारतीय अनमोल दौलत लुटतच राहिला..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# भीम मंदिराची लूट.

लहान, मोठी, विखुरलेली, भरत उपखंडातील अनेकानेक राज्यं, लहान मोठे जमीनदार, लष्करी विषयातील अज्ञान, युध्दशास्त्रातील मागासलेपण, चातुर्वर्ण्य पध्दतीमुळे फक्त क्षत्रियांना लष्करी शिक्षण आणि वैश्य-ब्राह्मण-शेतकरी-शूद्रांना त्या शिक्षणापासून वंचित ठेवणं या भारतीय दोषांमुळे, भारतीय राजसत्ता देशाबाहेरच्या लढाऊ अफगाणी टोळयांसमोर पराभव पाहू लागल्या..सबंध भारताला एकत्र ठेवू शकणारा सामर्थ्यवान राष्ट्रपुरुषही मिळाला नाही..त्यामुळे एकसंघ भावनाही देशात नव्हती..

गझनीहून निघण्याआधीच भारतातील श्रीमंतीची ठिकाणं महंमदने शोधून ठेवली होती..महंमदने सन १००९ साली केलेली प्रचंड मोठी लूट म्हणजे नागरकोटच्या भीम किल्ल्यातील लूट..नागराकोटचा हा भीम किल्ला महाभारताच्या काळापासून प्रसिद्ध होता..त्रिगर्त राज्य असा याचा उल्लेख महाभारतात आहे..या त्रिगर्तचा राजा सुशर्मचंद्र कौरवांच्या बाजूने लढायला उभा होता..हा भीम किल्ला एका उंच सरळसोट कड्यावरती बांधला होता.. तो जिंकणं कठीण या समजामुळे आजूबाजूच्या भागातील सर्व दानशूरांनी, भाविकांनी दिलेल्या देणग्या तिथे एकत्र ठेवल्या होत्या.




नागरकोटच्या गाफील राजाला बेसावध क्षणी गाठून. महंमदने अचानक त्या किल्ल्यावर हल्ला केला आणि डोळयांमधे मावणार नाही एवढी संपत्ती लुटली..आपली मूर्तिभंजक म्हणून कीर्ती होण्यासाठी, देवळातील मूर्ती फोडणं हा आणखी एक मिळालेला आनंद होता त्यांच्यासाठी..३ दिवसांच्या नंतर भीम किल्ला महंमदच्या ताब्यात आला..तिथे त्याला ७ लाख सुवर्ण दीनार, ७०० मण सोन्याचांदीची तबकं, २०० मण सोन्याच्या विटा, २००० मण चांदीची नाणी, २० मण विविध बहुमोल हिरे, माणिक, पाचू, पोवळी, मोती, अशी रत्नं, रत्नजडीत दागदागिने एवढी अलोट संपत्ती हाती आली..ही अमाप  लूट न्यायला, त्याने जिथून मिळतील तिथून उंट आणवले आणि त्यावर सारा खजिना लादला..एका उंटावर १५०० पौंड सामान लादता येत असे..असे अनेक उंट मिळवल्यावरही त्याची संपत्ती शिल्लक राहिली ती त्याने आपल्या ३०,००० फौजेत वाटून टाकली..या लूटीमधे त्याला एक ३० फूट लांब आणि १५ फूट रुंद असा चांदीमधे बनवलेला प्रासाद

मिळाला..अत्यंत सुंदर घडाईचा राजेशाही थाटाचा तो महाल न्यायचा कसा हा त्याला प्रश्न पडला होता. इतकी त्याची घडाई सुंदर होती.

गझनीला गेल्यावर त्याने आपल्या काही सेनाधिकाऱ्यांना त्यातील बहुमोल दागिने खूष होऊन भेट दिले..ही दौलत वाहून नेण्यासाठी त्याने भारतातलेच हत्ती, आपलेच उंट, आपलेच लोक हमाल म्हणून वापरले. त्यांच्याकडे फक्त थोराड अरबी घोडे होते..लांब दौड करणारे, कुठेही चरून आपलं पोट भरणारे, आणि सामान वाहणारे म्हणून शेकडो मैल दूरवर येणं त्यांना शक्य झालं..

पुढील वर्षी महंमदने श्रीठाणेश्वरवर स्वारी करायचं ठरवलं...त्यावेळी अनंगपाल हा दिल्लीचा राजा होता..(एकेकाळी ७ व्या शतकात चक्रवर्ती हर्षवर्धन इथला राजा होता.).त्याने आपल्या सर्व राजांना भावनिक आमंत्रण देऊन, हिंदूंचं श्रद्धेचं स्थान वाचवण्यासाठी एकत्र यायचं आवाहन केलं..ते सगळे गोळा होण्यापूर्वीच महंमद आपल्या फौजेसह तिथे पोचला आणि त्याने ठाणेश्वर यथेच्छ लुटलं..त्या खजिन्यात त्याला ४५० रत्तीचं एक माणिक सापडलं..शिवाय २ लाख स्त्री-पुरुष त्याने कैदी म्हणून नेले त्यामुळे गझनीत भारतीय नगरीचाच भास झाला होता. ते सगळे गुलाम बनवण्यात आले..या लुटीतून महंमदने स्वत:साठी सुवर्ण सिंहासन बनवलं..भारताचं ऐश्वर्य गझनीत साठत होतं..

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss

# मथुरा.

भव्य देखणी भारतीय मंदिरे ही जगाला मिळालेली भव्य वास्तू, कोरीव काम, आणि शिल्पकला याची देणगी आहे..दक्षिणेतील मंडप, गाभारा, त्यातील देवतांच्या मूर्ती, मंदिरांची उंची, त्यांची गोपुरे, मंदिरांवर काढलेली चित्रे ही राजाश्रयामुळे बहरलेली भारतीय संस्कृती आणि भक्तीपंथाचाही इतिहास आहेत..उत्तर आणि दक्षिण भारतील मंदिरांची रचना वेगळी होती..

पुरातन काळी बंद वेशींच्या आत नांदणाऱ्या गावांमध्ये मंदिरे ही पांथस्थांच्या वसतीसाठी असत..भक्तिसाधना, नृत्यकला, वास्तूकला, शिल्पकला, कीर्तनकला, धर्मसभा, धर्म विवेचन, संगीत यांचं सामाजिक आणि सांस्कृतिक आश्रयस्थान असे..चोला, पंड्या, पल्लव, गंगा, विजयनगर, साम्राज्यांच्या काळात उभी राहिलेली, मीनाक्षी मंदिर, श्रीरंगपट्टणचं रंगनाथ मंदिर, तिरुपति बालाजी, पद्मनाभ, यात द्राविडी शैली बहरली..हेमाडपंतांनी हेमाडपंथी रचनेत देवळं बांधली..नागरी स्थापत्य शैली ही नगरं निर्माण झाल्यावर झाली..नागर शैली आणि द्रविड शैलीच्या संगमातून बेसर स्थापत्य कला मंदिरांमद्धे दिसू लागली..उत्तरेत काशी विश्वेश्वर, कोणार्क, सोमनाथ, अष्टविनायक, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, अंबाबाई, स्वयंभू मंदिरे, अशा मंदिरांनी ही भारत भूमी समृद्ध झाली..

अजंठ्याची लेणी तर त्रैलोक्यातही बघायला मिळणार नाहीत पण अजूनही त्या मूर्तींची झळाळी कायम आहे..त्या मागचं रहस्य म्हणजे, त्या मूर्तींना दिलेला लेप..अशी परमोच्च दर्जाची लेपन पध्दती भारतीय शास्त्रज्ञांनी पुरातन काळीच शोधून काढली आणि त्याला नाव दिलं

वज्रलेप, हा वज्रलेप त्यांनी अजंठा, वेरूळ मधील मूर्तींवर चढवला..कसा बनवत असत हा वज्रलेप…? हा लेप बनवण्यासाठी समुद्रातील शिंपले गोळा केले जायचे, त्यात त्या भागातील माती, गाळाची माती, वारूळातील माती, चुना, धान्याचं तूस, घायपाताची किंवा गव्हाची काडं, बेलफळ, गुळाची मळी असे पदार्थ घालून ते मिश्रण ३/३ दिवस, एकूण २० वेळा फिरवलं जायचं..त्यातून निघायचा उत्कृष्ट लेप..मग तो लेप लेण्यांमधल्या मूर्तींवर चढवला गेला की मोत्यासारखी झळाळी त्या पाषाणाच्या मूर्तीला येत असे..ती आजवरही टिकून आहे..तोच वज्रलेप..

परकीय आक्रमणे नसल्यामुळे मिळालेल्या राजाश्रयामुळे राजांच्या भक्तीभावामुळे, समृद्धीमुळे शैव, वैष्णव, मंदिरं त्यांनी घडवली..अखंड डोंगरामधून खोदून काढलेल्या, श्रवणबेळगोल, अजिंठा, हम्पी यासारख्या अनमोल मंदिराची निर्मिती झाली..

या देशातील राजे-महाराजे-सम्राटांपेक्षा सर्वात श्रीमंत होते हे भारतातील देव..हिरे, मोती, सोने रत्ने यांच्या ठेवीचा तो खजिना असे..हे वैभव इतकं पराकोटीचं असे की त्यामुळेच अफगाणी, तुराणी, इंग्रजांसारखे लुटेरे देवळांवर हल्ला करून ही लक्ष्मी आपल्या देशात घेऊन निघून गेले..

**यातील एक नाव म्हणजे मथुरा.**

मथुरा..शत्रुघ्नाने स्थापन केलेली मधुरा नगरी..मधुरा नावच पुढे मथुरा झालं..श्रीकृष्णाचं जन्मस्थान मथुरा..देवकीचं माहेर मथुरा. संपन्न, समृध्द नगरी, तळी, उद्यानं, गोपुरं, मंदिरांनी नटलेली मथुरा.!.तिथल्या अमाप श्रीमंतीची पिढ्यानपिढ्या चालत आलेली कीर्ती भारतभर पसरली होती..अर्वाचीन काळात पेशव्यांचे मोठे सरदार, महादजी शिंदेबाबांची आवडती मथुरा..

गझनीचा महंमद १००१ सालात काश्मीरच्या जयपालावर विजय मिळवून वरचेवर भारत भूमीत यायला लागला..मथुरेच्या मंदिरातील श्रीकृष्णाला भिडायला हा अफगाणी कालिया, आपली फौज घेऊन सन १०१८ साली मथुरेभोवतालच्या भक्कम तटबंदीच्या बाहेर उभा राहिला..गझनीचा महंमद मथुरा मंदिर पाहून तर हरकलाच..लाखो दीनार खर्च केले आणि उत्कृष्ट कारागिरांच्या हाती दिली, तरी २०० वर्षे अशी सुंदर नगरी बांधून होणार नाही हे त्याचेच उद्गार होते..तिथल्या अनेक भक्कम कमनीय गुळगुळीत स्तंभांना रत्नाचं जडावकाम होतं..ते कोरीव काम फोडायला तोच तयार झाला नाही, इतकी ती शिल्पकला श्रेष्ठ दर्जाची होती.

मथुरेत ठायी ठायी देवळं होती..सर्व मंदिरांचा गाभारा शुध्द सोन्याच्या मूर्तींनी चमकत होता आणि प्रत्येक देवळात भरीव सोन्या रुप्याच्या मूर्ती होत्या..त्या सगळया त्याने गोळा केल्या..त्यातल्या ५ सुवर्णमूर्ती तर कोणत्याही आधाराशिवाय उभ्या राहण्याइतक्या जड वजनाने भारलेल्या होत्या, अमोल किंमतींच्या होत्या कारण त्यांच्यातील नेत्रांच्या लावलेली एकेक माणकं प्रत्येकी

५०,००० दीनार किंमतींची होती. ही दीनारची किंमत सन १०१५ सालची आहे आणि माणकं होती दहा..एक सुवर्ण मूर्ती अत्यंत बहुमोल स्फटिकासारख्या नील रत्नांची होती, ज्या नीलरत्नाचं वजन ४०० रत्ती होतं. १.९ रत्ती म्हणजे १ कॅरट, १ कॅरेट म्हणजे २ ग्रॅम, आणि जेव्हा ती मूर्ती वितळवली तेव्हा त्यातून ९८,३०० रत्ती शुध्द सोनं निघालं. एका मूर्तीचे नुसते चरणयुगुल तर ४४०० रत्ती वजनाचे होते. अशा किती सुवर्णमूर्ती महंमदला मिळाल्या त्याची गणती त्यालाच मोजता आली नाही..याशिवाय त्याला १०० चांदीच्या मूर्ती मिळाल्या..त्या त्याने वितळवून उंटांवर लादून नेल्या. एका उंटावर १५०० पौंड वजन लादता येत असे..त्याला असे अनेक उंट लागले..महंमदाने सगळी लूट भरली आणि नगरीला आग लावून दिली.

२० दिवस मथुरा जळत होती, भव्य देखण्या देवमूर्ती फुटत होत्या. शिल्पकला, लाकडी कोरीव तक्तपोशी जळत होत्या, मंदिरं उध्वस्त होत होती..महंमदने नंतर तिथले प्रासाद, घरं, किल्ले, लुटले..हा भेसूर, भयानक रानटी हल्ला झाला तेव्हा अनेक स्त्रियामुलींनी चितेत प्रवेश केला आणि त्याच्याशी लढतांना अनेक पुरुषांनी प्राणार्पण केलं..मथुरा ज्वाळांनी, जळक्या वासांनी भेसूर झाली..पण कृष्ण भगवानच विजयश्री त्यांच्या गळयात घालत गेला..स्वत:चंच मंदिर उध्वस्त करणाऱ्या भगवंताच्या भक्तांना मग कोण तारणार..?

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss

# सोमनाथ मंदिर.

भरतवर्षाच्या समुद्र किनाऱ्यावरील ५ पुरातन पवित्र तीर्थस्थानं म्हणजे, पूर्व किनाऱ्यावरील पुरी, रामेश्वर, चिदंबरम्, आणि पश्चिम किनाऱ्यावरील द्वारका आणि सोमनाथ..१२ ज्योतिर्लिंग स्थानांमधे सोमनाथाचा प्रथम क्रमांक लागतो..पुरातन काळी, दरवर्षी चंद्रग्रहणाच्या काळात आणि यात्रेच्या काळात २ ते ३ लाख यात्रेकरू सोमनाथ मंदिराला भेट देत असत..त्यासाठी गुजरातच्या राजाने २००० गावांचा वसूल मंदिराच्या व्यवस्थापनासाठी लावून दिला होता..दानशूरांकडून आणि भाविकांकडून या मंदिराला सोनं, चांदी, रत्नांच्या प्रचंड देणग्यांमुळे मंदिराची समृध्दी ओसंडून वाहात होती.. मंदिराचा परिसर १००० मैलांवरून, गंगेहून आणवलेल्या पाण्यानेच रोज दोन वेळा धुतला जाई..२००० ब्राह्मण सण, उत्सव, पूजाअर्चा करण्यासाठी मंदिरात नेमले होते..३०० वाजंत्रीवाले आणि ५०० देवदासी मंदिराच्या नृत्यसेवेत होते..हे १००० वर्षांपूर्वीच्या सोमनाथ मंदिराच्या व्यवस्थापनाचं वर्णन, भारतातील मुसलमान सत्तेच्या उदयाचा इतिहास सांगणाऱ्या फेरिश्ताने लिहिलं आहे..

उत्तर भारतातील समृध्द, वैभवशाली नगरं लुटल्यावर गझनीच्या महंमदची नजर सोमनाथ मंदिरात साठवलेल्या प्रचंड ऐश्वर्यावर गेली. गुजरात किनाऱ्यावरील सोमनाथ हे मुलतान या भारतात शिरण्याच्या प्रवेशद्वारापासून

१००० मैल दूरीवर असलेलं मंदिर..इ.स. १०२४ सालच्या ऑक्टोबरमधे, प्रवासाचा पूर्ण अभ्यास करून, ३० हजार फौज घेऊन गझनीचा महंमद, सोमनाथ लुटण्याच्या महत्त्वाकांक्षेने गझनीहून निघाला. आपल्या फौजेला खूप लांबचा पल्ला आणि वाळवंटाचा रस्ता आहे म्हणून अन्न आणि पाणी यांची भरपूर सोय करण्याची कल्पना देऊन ठेवली.. त्याने स्वत: २० हजार उंटांवर जरूरीचं सामान भरून घेतलं..वाटेतील अजमेरसारखी संपन्न शहरं लुटण्यात वेळ न घालवता तो सरळ सोमनाथाच्या दिशेने कूच करत राहिला..प्रवासातील वाळवंटात झालेल्या हालांमुळे त्याचे अनेक सैनिक मरण पावले...सोमनाथाजवळ आल्यावर त्याला समुद्राच्या पाण्यालगतचं प्रभास बेटावरील भक्कम तटबंदीच्या आत असलेलं मंदिर दिसलं..

त्याच्या फौजेने हल्ला सुरू केल्यावर शूर भारतीय सैनिक मंदिराचं रक्षण करायला लागले..अफाट संख्येने आलेल्या या फौजेपुढे दोन दिवस प्राणपणाने लढून त्यांनी शत्रूला माघार घ्यायला लावली..तिसरे दिवशी राजपुत्र ब्रह्मदेव आणि दवेशलिम फौज घेऊन मदतीला आल्यामुळे विजय त्यांचाच होणार होता..या भीषण लढाईत महंमदची फौज मार खायला लागली..ती पळून जायचा विचार करते आहे हे कळल्याबरोबर, तो तत्परतेने घोड्यावरून खाली उतरला, भूमीवर त्याने त्याच्या अल्लाला साष्टांग नमस्कार घातला आणि आपल्या सेनाधिकाऱ्याला बरोबर घेऊन त्याने सैनिकांना आरोळी ठोकत आवाहन केलं..त्याबरोबर त्याची फौज चेतवली गेली आणि “अल्ला हो अकबर” म्हणत हल्ला करायला झेपावली..५००० हिंदूंचा खूप मोठा नरसंहार मंदिराच्या भोवताली घडला..मंदिरातील सेवेकरी, नर्तिका, रयत ठार झाले..या

भीषण रणकंदनानंतर भारतीय सैनिक रणांगण सोडून सगळे नावांमधून समोरच्या बेटांवर पोचले..त्याबरोबर महंमदने त्यांचाही पाठलाग केला आणि वल्ह्यांनी त्यांना ठार केलं..बेटावरची सगळी शिबंदी, चौक्या ओस पडल्या,आणि महंमदला विजय मिळाला..तटबंदीभोवती आपली फौज तैनात करून नंतर मंदिराबाहेरील प्रेतांचे ढीग ओलांडत, तो आपल्या अधिकाऱ्यांबरोबर सोमनाथ मंदिराजवळ आला.

त्या मंदिराचं शिल्प, वास्तू पाहून त्याचे डोळे विस्फारले..अति मौल्यवान रत्नं जडवलेल्या आणि अतिसुंदर कलाकुसर केलेल्या भव्य, उंच ५६ स्तंभांवर, मंदिराचं छत सांभाळत सोमनाथाचं मंदिर उभं होतं.. सभामंडपाच्या मध्यावर ५ फूट उंचीची सोमनाथाची मूर्ती उभी केली होती. त्या मूर्तीचे २ फूट जमिनीत गाडलेले होते त्यामुळे विनाआधार ती स्थिर होती..सभामंडपात छतापासून खालपर्यंत २०० मण वजनाच्या सोन्याच्या साखळदंडाला सोन्याची मोठी घंटा टांगली होती..अंधारलेल्या सभामंडपात एकच मोठा टांगलेला सोन्याचा लामणदिवा होता, त्याचा प्रकाश मंडपात मंदपणे पसरला होता, त्या प्रकाशात मंडपातील चमचमणाऱ्या रत्नांची प्रभा प्रकाश वाढवत होती, इतकी मोठी रत्नं त्या मंदिरात होती..(त्या काळात रत्नांना पैलू पाडले जात नसल्यामुळे ती फार चमकत नसत.) शिवाय हजारापेक्षा जास्त लहान मोठ्या वेगवेगळ्या आकाराच्या सोन्याच्या आणि रुप्याच्या भरीव मूर्ती तिथे होत्या.

महंमदला आता त्या मूर्तीचे भाग मक्का-मदिना आणि त्याच्या गझनीतील मशिदीसमोर ठेवायचे होते..म्हणून महंमदने ती मूर्ती फोडण्यासाठी हातोडा उचलला, त्या क्षणी जमलेल्या जमावातर्फे काही ब्राह्मण पुढे झाले

आणि त्यांनी हा संहार थांबवण्याची विनंती केली..त्या बदल्यात तो मागेल तेवढं सोनं देण्याचा प्रस्ताव महंमदसमोर ठेवला. तो

आकडा ऐकल्यावर महंमदचे सेनाधिकारी तो प्रस्ताव स्वीकारण्याचा आग्रह करायला लागले..फेरिश्ता लिहितो की या प्रस्तावाने चाणाक्ष महंमदला लगेच लक्षात आलं की या मूर्तीची किंमत, ते देतील त्या सोन्यापेक्षा खूप मोठी आहे..पण प्रत्यक्षात तो म्हणाला की मला आपल्या भावी पिढीत, मूर्तीचा सौदागर म्हणून प्रसिध्द व्हायचं नाही आहे तर मूर्तीभंजक म्हणून नोंद व्हायला हवी आहे..असं म्हणून त्याने आपल्या जमावाला ती मूर्ती फोडायची आज्ञा केली..मूर्तीवर घाव पडायला लागले, मूर्तीचे अवयव वेगळे व्हायला लागले आणि जेव्हा त्या मूर्तीच्या पोटावर घाव बसला तेव्हा अचानक त्या पोटाच्या पोकळीत लपवलेल्या अगणित मौल्यवान रत्नांचा सडा पडला..ते कुबेराचं धन पाहून महंमद आणि जमाव थक्क झाला..त्यातून बाहेर पडलेले हिरे, मोती, माणिक, पाचू अनेक रत्नं, ब्राह्मणांनी दिलेल्या प्रस्तावापेक्षा कितीतरी पट जास्त होती..

महंमदने ती सगळी संपत्ती गोळा केली, त्या लहान मोठ्या हजारभर मूर्ती ताब्यात घेतल्या आणि मग तो रणभूमीवरून पळून गेलेल्या आणि समोरच्या बेटावर जाऊन लपलेल्या ब्रह्मदेव राजपुत्राला संपवण्यासाठी त्याच्या सैनिकांसह पाण्यात उतरला..पाण्याने वेढलेल्या त्या बेटावर पोचणं कठीण होतं पण त्याने आपल्या सैनिकांबरोबर अल्लाची प्रार्थना करून, एक जागा बेटावर पोचायला सोपी होती तिथे पोचला..राजपुत्र या हल्ल्याला घाबरून पळून गेला तेव्हा किल्ल्याच्या संरक्षणासाठी नेमलेली फौजही पळून गेली..ब्रह्मदेवाची सगळी

दौलत घेऊन महंमदने सोमनाथ सोडलं. मग वाटेवरच्या गुजरातच्या राजधानीवर हल्ला करून तीही यथेच्छ लुटली..तिथे सोन्याच्या खाणी आहेत अशी बातमी मिळाली म्हणून आपल्या मुलाला गझनीत ठेवून महंमदला तिथेच राहण्याची इच्छा होती, पण तेवढ्यात अजमेरचा राजा आणि ब्रह्मदेव राजपुत्र मोठी फौज घेऊन चालून येत आहेत ही बातमी गुप्तहेरांकडून मिळाल्यावर आपल्या सेनाधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार त्याने विचार बदलून, तो गझनीच्या दिशेने निघाला..

मात्र त्या मार्गात जाटांनी त्याचा कडवा विरोध केला..घमासान युद्ध झालं..खूप मोठी अफगाणी फौज ठार झाली..सोमनाथचा खजिनाही जाटांनी परत मिळवला..महंमदने सोमनाथाहून परतीच्या वाटेवर सिंधचा रस्ता धरला..वाटेत त्याला अनेक चकमकींना तोंड द्यावं लागलं..वैरणीच्या तुटवड्यामुळे गुरं मरायला लागली..वाळवंटातील उष्म्यामुळे पाणी पाणी करत फौज मरायला लागली..त्यातच सिंधमधे असतांना एका मार्गदर्शकाने ३ दिवस आणि ३ रात्री त्याच्या फौजेला चुकीच्या मार्गाने नेलं आणि फसवलं..त्यात अनेक सैनिक अन्नपाण्याविना हाल होऊन मेले..

या नुकसानीमुळे महंमदला त्या मार्गदर्शकाचा संशय आला..त्याने त्याची चौकशी करतांना समोर आलं की तो सोमनाथमधला ब्राह्मण होता, आणि महंमदचा सूड घेण्यासाठी त्याने हे कृत्य केलं होतं..महंमदने त्याला फाशी दिली..महंमदच्या गुजरातच्या प्रवासात त्याला एक कमान आणि आणि आणि त्यामधे कोणत्याही आधाराशिवाय हवेत तरंगणारी काळी मूर्ती दिसली..ती खाली का पडत नाही या कुतूहलाने त्याने आपल्याजवळच्या वैज्ञानिकांना

विचारलं तेव्हा ते म्हणाले की याचा अर्थ ती मूर्ती लोखंडाची असेल, आणि त्या दगडी कमानीतील दगडांमधे लोहचुंबकाचे गुण असतील… लगेच महंमदने ती दगडी कमान पाडली, त्याबरोबर मूर्ती खाली पडली. ती काळी मूर्ती हाताळली, तेव्हा तेच लोहचुंबकाचं शास्त्र त्यात होतं..आपल्या पूर्वजांनी तयार केलेलं एक सुंदर विज्ञान मोडून पडलं..

संतापलेला महंमद गझनीला गेल्यावर जाटांच्या सूडाच्या तयारीला लागला..त्याने यावेळी नाविक युद्धाची तयारी केली..लोखंडी आवरणाच्या नावा घेऊन तो आला..तेव्हा जाटांच्या लाकडी नावा त्यासमोर टिकल्या नाहीत..अनेक जाट सैनिक बोटीसकट बुडाले..जाटांचा पराभव झाला..

सोमनाथच्या स्वारीची मोहीम २ वर्षे ६ महिन्यांनी, अगणित संपत्तीने संपली..फेरिश्ताचं हे वर्णन वाचल्यावर प्रश्न एवढाच पडतो की १७ वेळा भारतावर चालून येणाऱ्या महंमदच्या आक्रमणातून धडा घेऊन, मौल्यवान रत्नं आणि सोन्यारुप्याच्या मूर्ती आधीच इतरत्र का हलवल्या नाहीत…? तो परत जातांना त्या परत मिळवण्यासाठी सगळया सत्ता एकत्र का नाही आल्या.? भारतातील ते अब्जावधीचं धन आणि कमान-काळया बाहुलीचं लाख मोलाचं ज्ञानही संपलं..सोमनाथाचं मंदिर भविष्यातील सुलतानांकडून लुटून घ्यायला परत उभं राहिलं..परमेश्वराला ही मूर्ती आवडली नव्हती म्हणून तो त्या मूर्तीतून निघून गेला असं भक्तांचं मत होतं..काय म्हणावं या अति भाबडेपणाला आणि भक्तीला..?

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss-.

# शेवटचे परकीय इंग्रज..

उत्तर भारत काबीज करून झाला होता..इंग्रजांचं आता लक्ष्य होतं ते दक्षिण भारताचा घास गिळण्यावर..ते फार कठीण होतं, कारण मैसूरचा टिपू आणि मराठ्यांच्या दरबारातील नाना फडणीस यांच्याशी गाठ होती..शस्त्रास्त्रांमध्ये इंग्रजांच्या बरोबरीने सामर्थ्य असलेला, स्वत: शूर पराक्रमी लढवय्या टिपू सुलतानाला संपवणे म्हणजे शिंगासकट अख्खा बैल अजगराने गिळण्यासारखं होतं..मुरब्बी, चतुर राजकारणी नाना फडणीस पुणे दरबार चालवत होते, पण तिथे दुसरे बाजीराव नावाचा एक धागा विसविशीत झाला होता..तिथे मराठ्यांची भरजरी शाल फाडायला सोपी होती..

तरीही ब्रिटीशांना काळजी नव्हती..या बेईमानीच्या भुसभुशीत मातीत क्षुद्र लाभावर फोफावणारं देशद्रोही फितुरीचं पीक अमाप होतं..जिथे शस्त्रे निरुपयोगी ठरतील तिथे यांचा वापर करणे सोपं होतं..इंग्रजांनी आता टिपू सुलतानावर जाळं टाकलं..टिपूने याचना केली नाही..इंग्रजांना शरण गेला नाही, कारण फ्रान्स त्याचा मित्र होता..फ्रान्सकडून नेपोलियनची मदत येईल या आशेवर तो होता..पण नेपोलियन मदत पाठवू शकला नाही..

ग. ज. रिचर्ड वेल्स्लीने आपल्या लष्कराला श्रीरंगपट्टणावर हल्ला करण्याचा आदेश दिला, त्याप्रमाणे इंग्रज सेनापति डेव्हिड ब्लेयरने ५ एप्रिल १७९९ ला राजधानी श्रीरंगपट्टणाला ५०,००० फौजेसह विळखा घातला..टिपू

सुलतानाची ३०,००० फौज होती..महिनाभर दोघांमध्ये झुंजी चालू होत्या..टिपूचा मंत्री मीर सादीक फितूर झाला..अखेर ४ मे या दिवशी इंग्रज शिड्या लावून किल्ल्यात शिरले..दुपारचं जेवण घ्यायला टिपू बसला इतक्यात त्याला इंग्रजांचा मोठा लोंढा आत शिरल्याची बातमी मिळाली..तो तसाच न जेवता उठला आणि आपल्या सैनिकांना जाऊन मिळाला..

४ मे, १७९९ या दिवशी सकाळी टिपूच्या ज्योतिषांनी दुपारी २ वाजेपर्यंत वाईट ग्रहदशेमुळे युद्धं टाळायला सांगितलं होतं..पण ते झालं नाही..घनघोर युद्धं पेटलं..टिपूची फौज युद्धं हरली पण टिपू दिसला नाही..म्हणून इंग्रज राजवाड्यात गेले पण तिथेही सुलतान नव्हता. संध्याकाळी टिपू सुलतानाचा जखमी, अचेतन देह इतर सैनिकांच्या शवाच्या ढिगाऱ्याखाली अडकला होता तो कंदिलाच्या उजेडात सापडला ती जागा सुलतानाच्या मरणोन्मुख रझाखानने हात उचलून दाखवली..सुलतानाचं शव बाहेर काढलं तेव्हा त्याचा देह, तो जिवंत असावा इतका उष्ण होता..डोळे उघडे होते,०चेहऱ्यावर समाधानाचे भाव होते..सुलतानाच्या डोक्यातून गोळी आत शिरून गालात अडकली होती...टिपू संपला..श्रीमंत मैसूरचा मोठा खजिना ब्रिटीशांच्या हाती लागला.

टिपू सुलतानाचा दुसरे दिवशी लालबागमध्ये दफनविदधी संपल्यावर ब्रिटीशांनी बंगलोर-मैसूर-श्रीरंगपट्टणमधलं, सुलतानाचे राजवाडे, प्रत्येक घर लुटून फस्त केलं..घराघरातले सोने चांदी रेशमी वस्त्रांची भरपूर लूट झाली..गावातील स्त्रियांनी अब्रू सांभाळायला जीव दिले..अनेक पुरुष जीव गमावून बसले..मग घरांना आगी लागल्या...

कर्नल वेलस्लिच्या नजरेखाली राजवाड्याची लूट सुरू झाली.. राजवाड्यात एका पेटाऱ्यात ४५ लाख हजारांचे सुवर्ण मोहरा, रत्ने आणि सोन्यांचे दागिने होते, राजवाड्यात आलेल्या सैनिकांनी ते सगळे इतक्या लोभाने खिशात भरले, की ते ओझं सहन होईना म्हणून फेकावे लागले..कुणी ती किंमतही करता न येण्यासारखी अनमोल रत्ने आपल्या तळावरील अधिकाऱ्यांना विकली..असे धनराशींनी भरलेले २० पेटारे तिथे होते..रेशमी ताग्यांच्या हजारो गासड्या पळवल्या..सुलतानाच्या लायब्ररीत अरेबियन, फारसी, हिन्दी, भाषेतील सूफीजम, वैद्यकीय, धार्मिक, आणि इतर विषयांवरील २००० पुस्तकं होती, ती ब्रिटीशांनी काही इंग्लंडला पाठवली काही कलकत्त्याला, इतकी ती दुर्मिळ मौल्यवान होती..रोज रात्री एकतरी पुस्तक वाचल्याशिवाय टिपू सुलतान झोपत नसे..टिपूचे काही दागिने, हिरे आणि अनमोल रत्नांनी जडवलेली तलवार इंग्लिश आर्मीने कर्नल वेलस्लीला भेट म्हणून दिली..दुसरी अशीच मौल्यवान तलवार सेनापति बेअर्डला देण्यात आली..टिपू सुलतानाचं सुवर्ण सिंहासन विंडसर पॅलेस सजवायला गेलं..एक तलवार कॉर्नवालीसला भेट देण्यात आली..टिपू सुलतानाचा बिदनूरचा खजिना ब्रिटिश फौजेने लुटला होता, तेव्हा खजिना लुटून परत जाणाऱ्या इंग्रजी फौजेने पक्षांच्या पंखांमद्धे आणि चोचींमध्येही मोती-माणके लपवली होती..टिपूचा शस्त्रांचा कारखाना, टिपूने शोध लावून बनवलेले रॉकेट इंग्रजांनी पळवले आणि ते पुढे नेपोलियन विरुद्ध वापरले..**टिपू सुलतानाच्या बोटातील राम अक्षर कोरलेली अंगठी कुणी नेली..?** टिपू सुलतानाचं ८ फूट लांब आणि ४ फूट रुंद असं सिंहासन होतं..या लाकडी आसनावर सोन्याचा जाड पत्रा चढवला

होता..त्यावर सोन्याची मेघडंबरी होती..त्या आसनाला चारी बाजूंनी सोन्याचा कठडा होता..डोळयात लालबुंद माणकं जडवलेली सोन्याची १० व्याघ्रमुखं त्या कठड्यासभोवार लावली होती..त्याच्या छताला सोन्याच्या तारेत बांधलेली मोत्याची झालर होती..सिंहासन हिरे, माणिक पाचूनी जडवलेलं होतं..टिपूच्या तलवारी-ढाली, तोफांवर सोन्याचे पत्रे होते आणि त्यावर वाघाच्या प्रतिमा होत्या..टिपू सुलतान एकदा शिकारीला गेलेला असतांना त्याच्यावर एका महाकाय वाघाने हल्ला केला..तेव्हा अंगावर आलेल्या त्या अजस्त्र वाघाचं धूड टिपूने आपल्या खंजिराने कापून काढून त्याला ठार केलं पण त्या क्षणी तो वाघाचा इतक्या प्रेमात पडला की प्रत्येक गोष्टीवर त्याने वाघाची प्रतिमा काढली..ते प्रेम इतकं पराकोटीचं होतं की आपल्या खास सोनेरी पोषाखावर त्याने लाल रंगांचे पट्टे काढले होते..ब्रिटीशांनी सगळं लंडनच्या बोटीत भरलं.

काय हा विचित्र योगायोग..टिपू सुलतान आणि नेपोलियन मिळून इंग्रजांना जिंकणार होते पण टिपूने बनवलेलं रॉकेट इंग्रजांनी नेपोलियनच्या नाशासाठी वापरलं गेलं..टिपू सुलतानाची शहीद झाल्याची बातमी आली त्यावेळी नाना फडणीस हताशपणे म्हणाले, आता स्वराज्याचा घासही इंग्रज गिळणार..तसंच झालं..

सारा देश इंग्रजांच्या हातात आला..मग जनतेची लूट सुरू झाली..लोभी हावरट इंग्रजांनी मिठावर कर लादला..आजवर कोणत्याही भारतीय राजाने गरिबांकडून मिठावर कर मिळवला नव्हता..शेतसारा वाढवला..धर्मांतरची सक्ती झाली..हिंदू धर्माची चेष्टा सुरू झाली..भारतातील कापूस इंग्लंडच्या मॅंचेस्टरमध्ये जाऊन तिथल्या लोकांना रोजगार आणि आपल्या शेतकऱ्याच्या हातात

कवड्या टिकायला लागल्या..मग आला डलहौसी नावाच्या गव्हर्नरने वारस नसलेली संस्थाने खालसा करायला सुरुवात केली..

यामुळे राजापासून रंकांपर्यंत प्रचंड असंतोष माजला..खालसा राजवाडे

इंग्रजी अधिकाऱ्यांनी क्रूरपणाने राजवाड्यातील खजिना आणि दौलतीची खणत्या लावून लूट करतांना दयामाया ठेवली नव्हती.. राजधानी जिंकल्यावर इंग्रज त्या शहरात बिजन करत असत, म्हणजे ५ वर्षांपासून ८० वर्षांच्या वयाचे सर्व पुरुष कापून काढत..दरोडेखोरांसारखंचं त्यांचं वर्तन होतं..पिढ्यान पिढ्या आपल्या शौर्याने राज्य निर्माण केलेल्या संस्थांनांची महाभारतातील सर्पयज्ञाप्रमाणे आहुति त्यात पडायला लागली..

एक राजवाडा, सरदारांचे चौसोपी वाडे, सावकारांचे महाल, प्रतिष्ठित दरबारी लोकांच्या हवेल्या, हे किती ऐश्वर्याने भरलेले असत म्हणजे, तिथली सुवर्ण सिंहासने, सोन्याचांदीची ताटे वाट्या, पातेली, भांडी, कळशा, हांडे, बसायचे चौरंग, सोन्यारुप्याच्या अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, राजघराण्यातील स्त्रियांचे बिंदीपासून पैजणांपर्यंतचे हिऱ्याचे, मोत्यांचे जडावांचे, रत्नांचे दागिने, मोत्यांनी भरलेली पोती, मोठमोठी चांदीची भांडी, जी वितळून सैनिकांना पगाराच्या वेळी त्याची नाणी बनवली जात, मखमली पडदे, झुंबरे, देवघरातील सोन्याच्या जड मूर्ती, तबके निरांजन-समया लामणदिवे, गालिचे, चांदीची पूजेची उपकरणे, रत्ने आणि सोन्याच्या तारेने जडवलेले राजेशाही कपडे, सोन्याने मढवलेले पलंग, मोत्यांच्या झालरी लावलेल्या मखमाली पालख्या, लेखण्या दौती, राजांच्या रत्नांनी मढलेल्या ढाली, तलवारी, हत्ती घोड्यांची

जीने, लांब लांब रत्नमाळांचे दागिने, पायातले तोडे, झोपाळे..अगणित अगणित दौलत.. असं सगळं ब्रिटीशांनी प्रत्येक संस्थांनिकांचे राजवाडे खालसा करतांना पळवलं..सगळंच अगणित असे..या मौल्यवान वस्तूंचा मग बाजार मांडून ती रत्ने विकून इंग्रज पैसा करत आणि स्वदेशी निघून जात..

आणि मग राष्ट्रभक्तांनी, राष्ट्रवीरांनी या इंग्रजांच्या विरुद्ध शस्त्र उगारलं..आपल्या देशाची लूट बाहेर जाताना पाहून ज्यांनी आवाज उठवला, त्या देशभक्तांपासून आपल्याला धोका आहे हे इंग्रजांना कळल्यावर, त्यांना मंडालेची शिक्षा झाली आणि क्रांतिकारक योजना आखणाऱ्या तरुणांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली..देशभक्त कोण हे इंग्रजांनीच ओळखलं होतं..बाकी घाबरून, इंग्रजांना शरण गेलेले रावसाहेब-अशा अंदमानातील देशभक्तांना दूषणे देण्यात धन्यता मानू लागले..

या परकीय सत्ताधीशांमद्ध्ये अफगाणी-तुर्की-मुघल आणि इंग्रजांमद्धे एक मोठा फरक होता..या मुसलमान सत्ताधीशांनी भारत भूमी आपली मायभूमी केली..इथली संपत्ति अफगाणिस्तानात नेली नाही..इथेच ताजमहाल-भूलभुलैय्या-गोल घुमट अशा सुंदर वास्तू निर्माण केल्या..त्यांची संपत्ती याच देशात राहिली..ब्रिटिश मात्र लुटायलाच आले, आणि या देशाची वाताहत करून गेले..घरात दरोडेखोरांचा हल्ला झाल्यावर कुटुंबाची, घराची जी वाताहत होते तेच भारतातही घडलं..ती वाताहत करून घेणं मात्र भारतीयांची कर्तबगारी..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# राज्ये, नगर नावांचा उगम.

महाभारतातील राजघराण्याचा परिक्षिताच्या मृत्यूनंतर हळूहळू लोप झाला..मग शेती करणारे जमीनदार आपल्या बाहुबलावर मोठे मोठे होत गेले आणि तेच भूमीपालक झाले..त्यातून त्यांनी आपापली राज्ये निर्माण केली..हे सुभे मग त्या त्या संस्थापकांच्याच नावाने ओळखले जाऊ लागले. भारतात अशी कित्येक राज्ये निर्माण झाली..अशाच काही राज्यांच्या नावच्या आख्यायिका..

**भागानगर आणि गोलकोंडा** - कृष्णराय राजाच्या पदरी इब्राहिम, बाहिरी निजाम, आणि अली आदिलशहा हे चाकरीला होते. कृष्णरायराजाने इब्राहिमला तेलंगणाचा सुभा सांभाळण्यास दिला तेव्हा इब्राहिम तेलंगणाला रवाना झाला..एक दिवस तो मुसी नदीच्या काठावरील जंगलात शिकार खेळायला गेला असतांना त्याचे कुत्रे एका सशाच्या मागे लागले..तो ससा जिवाच्या आकांताने धावायला लागला. पण हल्ली जिथे किल्ला आहे त्या भागात आल्यावर त्या सशाने कुत्र्यांवरच हल्ला केला आणि कुत्र्यांना पळवून लावलं..त्या सशाचा धीटपणा पाहून, इब्राहीमला खूप आश्चर्य वाटलं..त्याने एका ज्योतिषाला बोलावून या घटनेचा अर्थ विचारला..तेव्हा, त्या ज्योतिषाने

ही जागा शूरांची आहे, इथे किल्ला बांधवा असा सल्ला दिला..म्हणून इब्राहिमने ती जागा विकत घ्यायचं ठरवलं..

त्या मोकळ्या जागेत एक गरीब धनगर माणूस राहात होता..तिथे एक गोड्या पाण्याची विहिरही होती..त्या धनगराने, इब्राहिमला आपली मोकळी जागा देण्याला एका अटीवर संमती दिली..तो गरीब माणूस म्हणाला की माझ्या पूर्वजांपासून मी इथे राहतो आहे..आम्ही गोला-म्हणजे ग्वाला-गवळी-गुराखी-धनगर जातीचे आहोत, पण तुम्ही अधिकारी, तेव्हा तुम्हाला जागा देईन..ही आमची जागा गुरांच्या चरण्याची आहे..त्याला गोलावाडू म्हणतात..तर तुमच्या किल्ल्याचं नाव गोलाकुंडा व विसम बालेहिसार ठेवावे..विसम बालाहिस्सार म्हणजे उंचावर बांधलेला किल्ला.. इब्राहिमने ते मान्य केलं आणि जो किल्ला बांधला त्याचं नाव गोलकुंडा ठेवलं..गोलकुंडा हा ११ व्या शतकात काकतीय वंशाने मातीचा बांधलेला मनकल नावाचा किल्ला होता..तो पाडून तिथे दणकट गोळकुंडा किल्ला बांधला गेला..इब्राहीम कुतुबशाहा हा गोलकोंडा किल्ल्याचा खरा वास्तूकर्ता ..

पुढे तो शिकार खेळत जात असतांना त्याला एक यात्रेकरू बाई दिसली..तिने प्रवासात जेवणासाठी मुक्काम केला आणि दोन पाने वाढली..त्यातील एक पान इब्राहिमच्या खिजमतगाराला दिलं..त्या खिजमतगाराने इब्राहिमला ते जेवण दिलं..ते रुचकर जेवण जेवल्यावर इब्राहिमने खूष होऊन, त्या स्त्रीला ५०० रुपये, वस्त्रे, असा आहेर केला आणि तिला म्हणाला की, सुन भागम्मा, तुझा काही इरादा असेल ते मागणे..तेव्हा ती स्त्री म्हणाली की, महाराज आपण गोलगुंडा किल्ला बांधला आहे..आणि आपण

त्याभोवती शहर वसवणार आहात असं मी ऐकलं आहे. तर त्या शहराला माझं भागाबाई नाव द्यावं..इब्राहिमने ते कबूल केलं. मग गोलकोंडा किल्ला तयार झाल्यावर त्याच्या भोवतालच्या शहराला भागानगर हे नाव दिलं..ही आहे गोलकोंडा आणि भाग्यनगरची जन्मकथा..या भागातील हिऱ्यांच्या खाणीतून जगप्रसिद्ध हिरे निघाले त्यामुळे पुढे भागानगर भाग्यनगर बनलं..

## आग्रा नावाची जन्मकथा –



इ. स. १५०६ मध्ये आग्रा हे शहर सुलतान सिकंदर लोदीने वसवलं. त्या आधी सुलतानांचं बयाना हे मोठं दळणवळणाचं केंद्र होतं..सुलतान सिकंदरने जेव्हा आपलं लष्करी केंद्र स्थापन करायचं ठरवलं तेव्हा काही बुध्दिमान आणि हुशार लष्करी अधिकाऱ्यांना यमुनेच्या काठाचा अभ्यास करून कोणत्या जागेवर शहर वसवलं जावं याचा विचार मांडायला पाठवलं..त्या अधिकाऱ्यांनी यमुनेच्या तीरावरची मोठी मोकळी जागा

निवडली..ती जागा निश्चित झाल्यावर सुलतान सिकंदर स्वत: ती जागा बघायला आला. त्याला लष्करी तळासाठी ती जागा आवडली..

या ठिकाणी सुंदर वास्तू उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याचा विचार चालू असतांना सुलतानाने, दळणवळणासाठी, या जागेपासून दुसऱ्या गावी जायला मार्ग कोणता आहे असं विचारलं, तेव्हा त्याचा अधिकारी मेहेतर मुल्लाने, एका जागा दाखवत म्हटलं की तो उंचवटा असलेला भाग दिसतोय **तिथून आगे राह जातो**...तेव्हा सुलतान सिकंदर म्हणाला की मग आपण सध्या या जागेला "आगे राह" असंच म्हणू. अशा रीतीने आगे राहचं नाव आग्रा पडलं..इ. स. १५०५ मध्ये ही नगरी तयार झाली..सुलतान सिकंदरने ती आपली दुसरी राजधानी केली.

आपल्या देशातील नगरांची आणि राज्यांची नावेही त्यांच्या संस्थापकापासून ओळखली गेली..त्यातील आजवर श्रद्धेचं नाव आहे ते अयोध्या !..या गावाला तीन नावे होती, साकेत, वैशाख, साची, आणि या राजधानीची लांबी १२ योजने म्हणजे ४८ कोस होती..एक कोस म्हणजे ४ मैल..कोणताच परकीय योद्धा ते राज्य जिंकू शकला नाही म्हणून ती अ-योद्धा नगरी नावाने प्रसिद्ध झाली.

चक्रवर्ती राजा, शककर्ता विक्रमादित्याच्या नंतरच्या वारसांनी आपल्या राण्यांच्याखेरीज महालातील दासींबरोबर संबंध ठेवले..त्यांची जी मुलं झाली तीही राजाचीच मुलं होती..या मुलांना राजपूत हा शब्द मिळाला..पण खरी ओळख राजपूत राजा सूरजपासून सुरू झाली..या सूरज राजाला ३५ मुलगे

होते..जेव्हा सूरजचा पुत्र भयराज गाडीवर आला तेव्हा त्याने आपल्या खानदानाला राजपूत नाव दिलं..तेव्हापासून हा राजपूत समाज ओळखला जाऊ लागला.

ख्रि. पूर्व साल १११३ ते ८४० पर्यन्त राजा अश्वपती आणि त्याच्या वंशजांनी माळव्यावर राज्य केलं..अश्वपती राजाची राणी मालवी, हिच्यावरून त्या प्रदेशाला माळवा नाव पडलं..काहींच्या मते राजा मुलचंदपासून या प्रदेशाला माळवा नाव पडलं..अशी अनेक नगरींची नावं घराणं स्थापन करणाऱ्या पुरुषावरून पडलेली आहेत..कुलबर्गाचा संस्थापक कूलचंद, बिजयचंदवरुन बिजानगर..

महाभारतात उल्लेख असलेल्या प्रसिद्ध असलेली नावे अशी किष्किंधा - हम्पी नगरी, कर्हाटक – कऱ्हाड, सुप्पार – शुर्पारक – सोपारा ( वसईजवळ), कल्लिण – कल्याण, पलाईपटमाली- महाडाजवळील पाले, अशी अनेक आजची नगरे त्यावेळी वेगळ्या नावाने प्रसिद्ध होती..कान्यकुब्ज म्हणजे आजचं कनौज..याची एक आख्यायिका अशी आहे की प्राचीन काळचा राजा कौशिक याच्या सर्व १०० मुली कुब्जा होत्या..म्हणून ज्याच्या कन्या कुब्जा ते कान्यकुब्ज..या मुलींचा विवाह कापीली देशाच्या ब्रहमदत्ता राजाबरोबर झाल्यावर त्या सगळ्या सरळ झाल्या..हिमालयाच्या पलीकडील देश तिबेट याचं पुरातन नाव त्रिविश्टप आणि भूतानला भौत्यदेश म्हणत. ज्या वारणावतात पांडवांना जाळण्यासाठी लाक्षागृह बांधलं होतं, त्याच आजचं नाव लुधियाना..आजचं मिदनापूर म्हणजे मेदिनिपूर..

पुढे बदलत्या परकीय सत्ताधीशांनी आपली नावे ठेवली आणि मूळ नावे विस्मृतीत गेली..जशी नगरे आणि राज्यांच्या नावांच्या जन्मकथा आहेत तशाच आडनावे-नावेही कशी जन्मली त्याची रंजक माहिती आहे..

बाजीराव हा शब्द देवगिरीच्या यादवांच्या काळातील, १३ व्या शतकातील बाचीराव या मोठ्या अधिकाऱ्याच्या नावापासून तयार झाला आहे. बाची चा बाजी झाला. जोगदेव-मायदेव-जगदाळे ही नावे देवगिरीच्या सिंघणदेवाच्या काळातील अधिकाऱ्याची नावे आहेत..त्यांचे वंशज आज या नावाने प्रसिध्द आहेत..पुराणिक आडनावाची व्युत्पत्ती वेगळी आहे.

शिवाजी महाराजांच्या पदरी कोंडदेव सनकाडे नावाचा एक ऋग्वेदी ब्राह्मण पाणक्या म्हणून कामाला होता..शिवाजीमहाराज जेव्हा देहूला तुकोबांच्या दर्शनासाठी आले तेव्हा तोही त्यांच्याबरोबर देहूस आला होता.. तिथे एक ब्राह्मण वेदमंत्र शिकण्यासाठी तुकोबांकडे आला..त्याला काशीस असतांना स्वप्नात दृष्टांत झाला होता की तुकोबांकडून व्युत्पत्ती शिकावी. पण तुकोबांचं खेडवळी बोलणं ऐकल्यावर हा माणूस वेदांची व्युत्पत्ती कशी शिकवणार या विचाराने तुकोबांनी रचलेला अभंग त्याने दुर्लक्षित केला.. पण तिथेच उपस्थित असलेल्या कोंडभटाने तो अभंग तुकोबांकडून मागून घेतला..कार्तिकी वद्य एकादशीला कोंडभटाने तुकोबांचा उपदेश घेतला आणि त्यांच्या आशीर्वादाने चांगलं पुराण सांगू लागला. तेव्हापासून कोंडभट आणि त्यांचे वंशज पुराणिक आडनावाने ओळखले जाऊ लागले…

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# मयूर सिंहासन

भारताच्या पारतंत्र्याला महंमद घोरीच्या आक्रमणापासून सुरुवात झाली..मूळ अजमेरचा पृथ्वीराज चौहान-चाहमान हा शेवटचा हिंदू राजा..त्याच्या आजोबांनी अनंगपाल यांनी आपलं दिल्लीचं राजी पृथ्वीराजला दिलं..सन ११९४ मध्ये, त्याचा पराभव करून महंमद घोरीची राजवट दिल्लीत सुरू झाली..पुढील ३०० वर्षे त्या सत्ता बदलत गेल्या..

या अफगाणी, तुराणी, इराणी राज्यकर्त्यांना घालवून समरकंदचा बाबर हा मुघल सेनानी दिल्लीत इ.स. १५२६ मध्ये कायम झाला..बाबर- हुमायूँ - अकबर-जहांगीर (सलीम), त्यानंतर जहांगीरचा शहजादा शाहजहान हा बादशहा बनला, तेव्हा तो त्याच्या बापजाद्यांनी जिंकून ठेवलेल्या, काबूलपासून गुजराथपर्यन्त पसरलेल्या साम्राज्याचा, भारतातील अफाट श्रीमंत, अगणित दुर्मिळ अमूल्य रत्नांनी तुडुंब भरलेल्या खजिन्याचा शहेनशहा होता.

शहाजहानला अलौकिक वास्तू निर्मितीचा मोठा शौक होता, म्हणूनच त्याने ताजमहाल निर्माण केला..दिल्लीत सुंदर मोती मशीद बांधली..मयूर सिंहासनही त्यानेच निर्माण केलं..ते रत्नजडीत मयूर सुवर्ण तख्तही खूप

गाजलं..त्याचं नाव तख्त ए ताऊस, ताऊस म्हणजे मयूर..आधी याचं नाव रत्नजडीत तख्त असं साधंच होतं.. मात्र परदेशी प्रवाशांनी त्याचं नाव मयूर सिंहासन केलं..या सिंहासनाचं २२ मार्च १६३५ मधे शहाजहानने उद्घाटन केलं..हे सिंहासन घडवायला, ७ वर्षे लागली..हे तख्त बनवणाऱ्या सैद गिलानी या कारागिरावर खूष होऊन शहाजहानने त्याच्या वजनाइतकं सोनं



त्याला बक्षिस म्हणून दिलं.. शहाजहानच्या या जगप्रसिध्द आसनाचं, भारतात प्रवासी म्हणून आलेला आणि मग शहाजहानचा मुलगा दारा शुको याला वैद्यकीय उपचार देणारा, १२ वर्षे भारतात राहिलेल्या फ्रेंच डॉक्टर फ्रँकॉइज बर्नियरने लिहिलेल्या आणि "Travels In Moghul Empire- मधे याचं व्यवस्थित वर्णन करून ठेवलंय..भारतीय सत्ताधीशांमधे सर्वात श्रीमंत सत्ताधीश म्हणून गाजला तो शहाजहाँ..त्याचा खजिना अनेक मौल्यवान आणि दुर्मिळ रत्नांनी गच्च भरला होता..त्याने बनवलेलं हे मयूर तख्त शहाजहानच्या खास दिवाण- ए- खास मधे ठेवलं होतं.

त्या खास महालात जाण्यापूर्वी प्रत्येकाची, लाल मखमली पडद्याजवळ उभ्या असलेल्या काळ्याकभिन्न खुनशी दिसणाऱ्या हबशांच्याकडून कडक तपासणी केली जायची..मग महालात शिरल्यावर जे अद्वितीय नेत्रसुख पहाणाऱ्याच्या दृष्टीला पडे, ते अवर्णनीय असे..हा संपूर्ण दिवाण ए खास महाल, संगमरवरी होता..याच्या भिंतीवर केलेल्या नक्काशीत मौल्यवान माणिक-पाचू-नील रत्नांचं मीनाकाम केलेलं होतं..या दिवाण-ए-खासच्या छताला सोन्याचा पत्रा मढवलेला होता..दिवाणखान्याच्या मध्यावर प्रशस्त संगमरवरी चौथऱ्यावर ते सुवर्ण तख्त ठेवलेलं होतं..चौथऱ्याच्या चार टोकांना सुवर्णस्तंभ लावलेले होते, ज्यावर चौकोनी सुवर्ण छत्र तोललेलं होतं..या चौकोनी छत्राखाली असलेल्या ६ फूट लांब आणि ४ फूट रुंद अशा सुवर्ण चौकोनी मसनदीला, सोन्याचे ६ जड पाय लावलेले होते..तख्तावर हिरे, माणिक, माणिक जडवलेल्या १२ खांबांनी उचलून धरलेलं गोल छत्र होतं. या प्रत्येक एकाआड एक खांबांवर मध्यभागी एक मोठं माणिक आणि त्याभोवती ४ लहान पाचू आणि मध्यभागी मोठा पाचू आणि भोवतालून माणिक बसवलेले होते..माणिक आणि पाचूमधली जागा हिऱ्यांनी मढवलेली होती.आसनावर चढण्यासाठी सोन्याच्या पायऱ्या केलेल्या होत्या. आसनाच्या तीन बाजूंना मखमली लोड ठेवलेला असे..त्यातला पाठीमागचा लंबगोल होता आणि दोन हाताशी असलेले सपाट लोड होते.

तख्तावर जी मेघडंबरी होती, त्यावर दोन नील रत्नांचे आणि इतर रंगांची रत्नं जडवून दोन मोर, त्यांचा रंगबिरंगी रत्नजडीत पिसारा आणि मधे एक पोपट रत्नांनी मढवलेले होते..या मोरांच्या तोंडात मोत्याचे सर होते..त्याकाळात

लोकांनी अफवाही अशी उठवली होती की, जेव्हा शहाजहाँ सिंहासनावर बसतो तेव्हा ते एकेक मोती सरकायला लागतात आणि त्यातून अल्ला अल्ला असा आवाज ऐकू येतो. सामान्यांना हे सिंहासन प्रत्यक्ष कुठून बघायला मिळणार.? तख्ताजवळ एक रत्नजडीत तलवार, एक तीर-कमान आणि एक ढाल होती. या तख्ताला जी १०८ माणकं होती ती १०० ते २०० कॅरेट वजनाची आणि बदकशा मधून मागवलेली होती. बदकशाची माणकांची खाण खूप प्रसिध्द होती. ३० ते ६० कॅरेट वजनांची अत्यंत तेजस्वी ११६ पाचू रत्नं होती..मेघडंबरीच्या आतल्या बाजूने त्यात असंख्य हिरे बसवले होते आणि मोत्यांची झालर लावलेली होती..या तख्तावर सुंदर रत्नांनी फुलं पानं वेलींची चित्रं काढली होती.

सन १७३९ मधे नादिरशहाने असमर्थ मुघल बादशहाला पराभूत करून दिल्ली लुटली आणि अगणित संपत्ती घेऊन तो निघून गेला..त्यात मयूर सिंहासनही गेलं. कोहिनूर सारखे गुलाबी, हिरवे, अंड्याच्या आकाराचे मोठे हिरेही गेले. या मातीने सोनं-रुपं-रत्नांची, खनिजांची भरभरून दौलत दिली ती सगळी जगभरच्या परकीयांनी लुटली..मग इंग्रजांनी आपलं सगळंच ज्ञान-परंपरा-रितीरिवाज-आयुर्वेद फोडलं आणि मोडलं..खालसा केलेल्या संस्थानिकाचे खजिने रिकामे करून इंग्लंडला नेले..

SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

# हत्ती.



अचाटशक्ती-युक्ती-बुध्दी-जाडी-उंची असलेलं प्राणी विश्वातील आश्चर्य म्हणजे हत्ती..देव दानवांच्या समुद्र मंथनातून ऐरावत हत्ती मिळाला, आणि इंद्राचं वाहन बनला..हत्तीचं वर्णन महाभारतात आहे, पण रामायणात नाही..हत्ती हे भारताचं वैभव..हिमालयापासून गंगेच्या पठारापर्यंत अनेक जंगलं होती, त्यात हत्तींची वस्ती असे..दक्षिणेत मैसूरपासून खाली हत्ती सापडत..प्रत्येक राजाकडे गजदलाचं आणि ५ रत्नांमधे गजरत्नाचा समावेश होता..हत्ती हा जंगलातून

आणला जायचा..हत्तीणीला जंगलात नेलं की तिच्यामागून हत्ती येत, म्हणजे फुसलावून आणायची हीच हत्ती मिळवण्याची पध्दत होती..पाळीव हत्तीकडून नवीन पैदास होत नसे, म्हणून हत्तीचा बाजार भरत नसे..ते एकमेकांचे पळवून आणून हत्तीचं दल वाढवलं जाई..

फक्त सम्राट अकबराने प्रथम एका पाळीव हत्तिणीकडून पैदास करवली होती, पण ते अपवादाचंच होतं..हत्तींची किंमत त्याकाळात ५ हजारांपासून सुरू होई..सुंदर धिप्पाड हत्तीची १ लाखापर्यंत किंमत असे..पांढरा हत्ती हा तर अत्यंत दुर्मिळ प्राणी होता..महंमद घोरीला काशीच्या आक्रमणाच्या वेळी मिळाला होता..शाहजहानकडेही असा पांढरा हत्ती होता..अकबराने खूप शोध घेऊनही त्याला असा हत्ती मिळाला नव्हता..ज्या हत्तीला दात येत नसे त्याला मुकणा हत्ती म्हणत..त्यावरुन आपला “ मुकणे ” म्हणजे नसणे, उदा. आनंदाला मुकणे हा शब्द आला आहे. हत्ती खुळावला तर त्याला लागीरं झालं असा शब्द होता..हत्ती हा बुध्दीवान प्राणी..जुन्या काळात लढायांच्या वेळी अवजड तोफा वाहून नेण्यासाठी गाडी ओढायला बैलांच्या अनेक जोड्या वापराव्या लागत..मैसूरचा नबाब हैदरअलीने यांच्या सोबत एकेक हत्तीही ठेवला होता..चढावर गाडी असतांना तर मागचा हत्ती आपल्या गंडस्थळाने रेटा देऊन गाडी वर चढवत असे आणि उतारावर असतांना बैलांचा ताबा सुटून गाडी वेगाने खाली यायला लागली तर मागचा हत्ती, शेवटी लावलेल्या साखळीने गाडी ओढून धरायचं काम करत असे.

एकदा मैसूरचा नबाब हैदरअलीचा एक फ्रेंच सेनाधिकारी तोफेच्या गाडीबरोबर होता..त्याला बैलांच्या अनेक जोड्यांची लांब माळ जोडली

होती..तोफ चढत असतांना, या बैलांची माळ चढाच्या वळणावर सरळ रेषेत येईना..त्या जोड्या मोडायला लागल्या..तोफ वर चढेचना..बराच वेळ हा गोंधळ चालू होता..शेवटच्या जोडीच्या मागचा एक हत्ती हे सारं पाहात शांतपणे झुलत उभा होता..थोड्या वेळाने त्याने एका झाडाजवळ जाऊन एक दणकट फांदी तोडली..ती घेऊन बैलजोड्यांकडे आला आणि एकेका जोडीला रट्टे लगावत त्यांना सरळ रेषेत आणलं..तो फ्रेंच अधिकारी हा चमत्कार बघतच बसला.

**हत्तीची सावधानता..**इंग्रज आणि फ्रेंच सेनाधिकाऱ्यांनी आपल्या पुस्तकातून भारतीय सत्ताधीशांच्या लढायांची वर्णनं लिहून ठेवली आहे.. एकदा इंग्रजांची श्रीरंगपट्टणच्या वेढ्यासाठी तोफ वाहून नेणारी बैलगाडी एका नदीच्या कोरड्या पात्रातून जात होती..नदीचं पात्र वाळूसारख्या मातीचं असल्यामुळे गाडी एकसारखी त्यात रुतत होती आणि डगमगत चालली होती..तेवढ्यात गाडीवरचा गाडीवान या हिसक्यांनी जमिनीवर पडला..बैल तसेच पुढे जायला लागले आणि दोन चाकांच्या मधे पडलेल्या गाडीवानाच्या अंगावरुन मागचं चाक जाणार, इतक्यात मागून चालत असलेल्या हत्तीने ते पाहिलं. त्याने लगेच आपल्या सोंडेने मागचं चाक तोफेसकट सबंधच्या सबंध उचलून धरलं आणि बैलांनी गाडी तशीच तीन चाकांवर पुढे नेल्यावर त्याने चाक खाली ठेवलं..गाडीवानाचा प्राण त्याने वाचवला एवढी समयसूचकता त्या बुद्धिमान प्राण्यात आहे..

**हत्तीचं खाणं अफाट**..तो जे गवत खातो, ते दुसरे दिवशी जसंच्या तसं बाहेर काढतो. पाणीही भरपूर पितो आणि तेच बाहेर काढून आपल्या अंगावर उडवतो, पण त्या पाण्याला जराही घाण वास येत नाही आणि पाठीवर कुणी

स्वारी बसली असेल तेव्हा तो पाणी काढून स्वत:ला भिजवत नाही. कवठाची फळं तो जशीच्या तशी गिळतो आणि दुसरे दिवशी बाहेर काढतो तेव्हा आतला गर नाहीसा होऊन टेनिसच्या चेंडूएवढा गोळा बाहेर टाकतो. दोन हत्तींची झुंज चालू असली आणि त्यांच्यामधे एखादा छावा आला तर ते दोघे थांबतात, पिल्लाला बाजूला करतात आणि परत झुंजायला लागतात.

हत्तीणीशी तो कधीही लढत नाही..त्याची मादी मेल्यावर तो काही दिवस खाणंपिणं सोडतो..हत्तीणींना जंगलात नेऊन जंगली हत्ती पकडले जातात आणि मग माणसाळवले जातात..पण हत्ती कधीही आपल्याला फसवणाऱ्या हत्तीणीचा राग मनात धरत नाही..हत्तीला आपलं मरण आलेलं कळतं..मग तो दूर, शांत ठिकाणी जाऊन प्राण सोडतो, त्यामुळे त्याचं शव कुणाला दिसत नाही..सुंदरबनमधील हत्ती, आपला अंतकाळ जवळ आला की खाडीजवळ दलदलीत जाऊन झोपत असत आणि भरती आली की नाहीसे होत असं सांगतात..हत्तींच्या गंडस्थळाजवळ बारीक बारीक १२ छिद्रे असतात..त्यातून २/३ महिने पांढरा, तांबूस रंगाचा द्रव वाहतो त्याला मद म्हणतात आणि हत्ती मस्तीत आला म्हणतात..हत्ती ५० वर्षांच्या नंतरही आपल्या माहूतास ओळखू शकतो..आपल्या शत्रूसही ओळखू शकतो आणि त्या हल्लेखोराला ठार करतो.

हत्तीला निसर्गाचं उपजत ज्ञान आणि त्यातून मार्ग काढण्याची बुध्दीही आहे..एकदा फौज नदी ओलांडत होती, तेव्हा एक उंट काही केल्या पाय पुढे टाकेना..उंटाला पोहता येत नाही, म्हणून पाणी खोल असावं अशी सारवानाला शंका आली..म्हणून मागच्या हत्तीला पुढे घातलं..पण तोही जाईना, तेव्हा

लक्षात आलं की तिथली नदीखालची वाळू सरकत होती.. मग दोघांनाही काही मैलांवरच्या उतारावर नेल्यावर हत्तीने प्रथम नदी पार केली आणि मग उंट त्याच्यामागोमाग गेला.

हत्ती जर चिखलात रुतायला लागला तर माहूत त्याच्यासमोर खूप गवताच्या पेंड्या टाकत असे, मग हत्ती त्यांच्यावर पाय देऊन बाहेर पडे.  ईस्ट इंडिया कंपनीच्या सर्जन असलेल्या डॉक्टरला हत्तीवरून रोज गयेत जावं लागे..त्या वाटेवर एक छोटा पूल होता..एक दिवस तो पूलाकडे गेला पण हत्ती पूलावर पाय ठेवेना..माहूताने टोचून टोचून त्याला पुलावर घातलंच पण त्याक्षणी पूल कोसळला आणि माहूत आणि हत्ती खाली चिखलात पडले..माहूत तर ठारच झाला, पण हत्तीही थोडा जखमी झाला..हत्तीने पुलावर आल्यावर आपल्या सोंडेने चाचपणी केली होती..

जगज्जेता बनायला निघालेल्या सिकंदरला पोरसचं गजदल जेव्हा प्रथमच पाहायला मिळालं तेव्हा तो अजस्त्र देह पाहून त्याचे सैनिक खूप घाबरले..पण कसलेला सेनापति, योद्धा सिकंदरने अशा महाकाय प्राण्याला, या हत्तींना पळवून लावायला त्रिशंकुसारखे अणकुचिदार खिळे बनवून सम्राट पोरसच्या मार्गावर टाकले, ते पायात रुतून जखमा झालेले हत्ती ते माघारी फिरले..आणि त्या भगदाडीत..पोरसचं पायदळ जखमी होऊन पोरसची ही शक्ति कमी झाली..

मुघल सुलतान, मराठेशाहीत हत्तीच्या झुंजी लावल्या जात..एकदा शाहजहान यमुनेच्या तीरावरच्या वाळवंटात आणलेल्या आपल्या दोन हत्तींची

झुंज पाहायला लाल किल्ल्याच्या सौध्यात (गॅलरी) बसला होता..त्या काळात यमुना किल्ल्याच्या जवळून वाहत होती..दोन धिप्पाड माजलेले हत्ती सुधाकर आणि आणि सुरतसुंदरची झुंज सुरू झाली..शहाजहानचे चारही मुलगे यमुनेच्या तीरावरच्या वाळवंटात घोड्यावर बसले होते..बाकी सर्व दरबारी आणि नगरवासीही गोळा झाले होते..औरंगजेब तेव्हा १४ वर्षांचा होता..झुंजत झुंजत दोन्ही हत्ती शहाजहान बसला होता तिथे आले..औरंगजेब तेव्हा अगदी जवळ उभा होता..अचानक त्यातल्या सुधाकर हत्तीने पिसाळून आपला मोर्चा औरंगजेबाकडे वळवला..भयंकर चित्कारत येणाऱ्या त्या महाकाय हत्तीला पाहूनही औरंगजेब आपल्या जागेवरून तसूभरही हलला नाही उलट आपला भाला त्या हत्तीवर फेकला..भाला टोचल्याबरोबर तो हत्ती आणखीनच पिसाळला..आणि सरळ औरंगजेबाच्या अंगावर आला..त्याचा घोडाही आपल्या मजबूत सोंडेने खाली पाडला..औरंगजेब झटकन जमिनीवर उतरला..आपली तलवार काढून त्याने हत्तीवर चालवली..आता झुंज औरंगजेब आणि हत्तीत सुरू झाली..सुधाकर हत्तीचा जोरात चीत्कार होता..ते भयंकर रूप पाहून ही झुंज पाहायला जमलेला जमाव सैरावैरा धावायला लागला..त्यांच्या आरडाओरड्याने भाल्याने जखमी झालेला सुधाकर हत्ती आणखीनच संतापला..त्याला घाबरवायला फटाके सुरू झाले..


तेवढ्यात औरंगजेबाचा भाऊ शुजा धावत त्याच्या मदतीला आला..पण सुधाकर हत्तीने त्यालाही खाली पाडलं..पाठोपाठ राजा जयसिंगही त्या हत्तीवर चालून गेला आणि आपल्या भाल्याने हत्तीला दुसऱ्या बाजूने जखमी केलं..शहजहान श्वास रोखून ही झुंज पाहत होता..एकेकाळी त्यानेही

असाच एका अंगावर चालून आलेला वाघ आपल्या तलवारीने कापून काढला होता..तेवढ्यात दुसरा सुरतसुंदर हत्ती सुधाकरच्या जवळ झुंजायला आला. त्यावेळी सुधाकर जखमांनी थकून गेला होता..तो लढाई हरला..त्यानंतर जमलेल्या जमावाने औरंगजेबाचा जयजयकार केला..शहाजहान आपल्या पुत्राच्या धाडसावर बेहद्द खूष झाला..त्यानंतर ३ दिवसांनी औरंगजेबाचा पंधरावं वर्ष लागण्याचा वाढदिवस मोठ्या दणक्यात साजरा झाला..बादशहाने त्याला बहादूर हा किताब, २ लाख सुवर्ण मोहरा, औरंगजेबाच्या वजनाइतकं सोनं आणि सुधाकर हत्ती बक्षीस दिला..

एकदा माधवराव पेशवे दोन हत्तींची झुंज पाहायला नदीच्या काठावर बसले होते..हत्तींची कुस्ती जोरात सुरू झाली..आणि अचानक त्यातील एक हत्ती पेशव्यांच्या तंबूकडे धावत यायला लागला..पण माधवराव न घाबरता तिथेच बसून राहिले..हत्ती आपल्या धन्यावर फार प्रेम करतो..थोरले शाहूमहाराजांचा कैलासवास झाला त्यानंतर ८ दिवसांमध्ये त्यांचा आवडता हत्तीही हे जग सोडून गेला..असं आहे हत्ती हे भारताचं वैभव आणि भूषण..

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss

# सम्राट अकबर



सम्राट अकबराचा पिता हुमायून याचं चरित्र हे जितकं एखाद्या अपयशी नायकाची कादंबरी वाटावी असं खडतर, तितका सम्राट अकबरचा जन्मकाळ हा एखाद्या कादंबरीला शोभाव्या अशा घटनांनी भरलेला आहे..

मुघल वंशाच्या बाबरने दिल्लीच्या लोदी घराण्याचा शेवट करून आग्र्यात आपली

राजधानी केली..पण त्याचा लहान मुलगा हुमायूँ खूप आजारी पडला तेव्हा पुत्राला वाचवण्यासाठी तुझं प्राणप्रिय असलेलं त्याग कर असा सल्ला त्याला फकिराने दिला..बाबरने सर्वात प्रिय असे आपले प्राण पुत्राला दिले..चमत्कार म्हणजे, बाबर मरण पावला आणि हुमायूँ वाचला..हुमायूँच्या आयुष्याची सुरुवातच अशी नाट्यमय झाली पण त्यानंतर मात्र संकटांची साखळी त्याला जखडत गेली..बाबरच्या मरणानंतर हुमायूँच्या हाती सत्ता आली पण, त्याचा प्रतिस्पर्धी शेरखानने हुमायूँला पळवून लावलं. तेव्हा तो सिंधला रोहरीला पोचला..तिथे सिंधू नदीच्या तीरावर जवळच पाटारला त्याच्या भावाची - हिंडालची छावणी होती.

त्या छावणीतील मीर बाबा दोस्त याची, १४ वर्षांची एक अतिसुंदर इराणी युवती हमिदा बानू, त्याच्या सहज नजरेत भरली आणि तो तिच्या प्रेमात पडला..जनानखाना बाळगणाऱ्या या अस्थिर शहाशी तिला अजिबात लग्न करायचं नव्हतं, पण नियतीला एक जागातिक तोलाचा सम्राट तिच्या पोटी जन्माला घालायचा होता..त्यामुळे तो निकाह १४ ऑक्टोबर १५४१ मधे पार पडला..पाठोपाठ दुर्दैव आणि हालअपेष्टांनी, हुमायूँ परत बेघर झाला इतका की त्याला फकिरी पत्करावी असं वाटू लागलं..त्यातच बरोबर आलेल्या हमिदाबानूचेही गर्भारपणाचे दिवस भरत आले होते..पण बीरीसाल या राजपूत राण्याच्या आमंत्रणावरून तो ऑगस्टमधे अमरकोट इथे पोचला तेव्हा त्याबरोबर फक्त नऊ लोक शिल्लक राहिले होते इतकी त्याची विपन्नावस्था झाली होती.

**अमरकोटचं वास्तव्य मात्र जरा सुखाची झळुक देणारं ठरलं..या राण्याने हुमायूँला एक किल्ला रिकामा करून दिला..तिथे पोचल्यावर दोन महिन्यांनी १५ ऑक्टोबर १५४२ ला अकबराचा जन्म झाला..**यावेळी हुमायूँ फौज घेऊन भक्करच्या मोहिमेवर गेला होता..त्याला पुत्रजन्माची बातमी जाताना वाटेवरच मिळाली तेव्हा तो इतका कफल्लक होता की त्याने आपल्या कस्तुरीने भरलेल्या अत्तरदाणीचे भाग सुटे करून आपल्या लोकांमधे वाटले..या कस्तुरीच्या सुगंधासारखी माझ्या पुत्राची कीर्तीही जगभर पसरेल अशी मी प्रार्थना करतो असं म्हणाला..त्याने आपल्या मुलाचं नाव जलाल उद्दीन महंमद अकबर हे नाव जाहीर केलं..

अकबरला घेऊन हमिदा बानू अमरकोटहून ५५ दिवसांनी हुमायूँकडे पोचली..अकबरासाठी जिजि अनगा हिची दूधआई म्हणून नियुक्ती करण्यात आली..अकबर बाळ छान बाळसं धरायलाल लागलं..त्याचं हसणं फार गोड होतं..छावणीमधे तो सर्वांचा आवडता खेळ बनला..अकबर १ वर्षांचा असतांना त्याच्याही हालअपेष्टांना सुरूवात झाली..हुमायूँची भक्करची मोहीम सपशेल फसली तेव्हा तो कंदाहारकडे जायला निघाला..ही बातमी कळताच त्याचा भाऊ अस्कर याने हुमायूँच्या छावणीवर हल्ला केला..तेव्हा आपल्या तान्ह्या पुत्राला विश्वासू खाजगी नोकरांच्या हवाली करून हमिदाबानूला घेऊन एका घोड्यानिशी छावणी सोडून हुमायून निघून गेला..दुसरा वेगळा घोडाही हमीदाबानूसाठी नव्हता इतकी त्याची परिस्थिति खालावलेली होती..

मग हुमायूँचा भाऊ अस्करने हुमायूँची छावणी सारी मालमत्ता आणि बाळ अकबराला ताब्यात घेतलं..पहिल्या वर्षीच अकबर ओलीस म्हणून कैदेत

पडला..फक्त त्याची दूध आई महमा अनगा आणि जिजी अनगा यांना अकबरासाठी त्याच्या बरोबर राहण्याची परवानगी मिळाली..तिथे अकबर दोन वर्षे राहिला..पण परत एक नाट्यमय घटना घडली..इराणच्या शहाची फौज घेऊन हुमायूँ चालून येतो आहे हे कळल्यावर ऐन हिंवाळयात, बर्फ पडत असतांना काका अस्करने ३ वर्षांचा अकबर आणि त्याची सावत्र बहीण, बानु बेगम या दोघांना वेषांतर करून खोटी नावे देऊन काबूलला बाबराची बहीण खानजादा बेगमकडे पाठवलं..तिथे अकबराच्या जीवाला धोका निर्माण झाला..म्हणून आपल्या मुलाला ताब्यात घेण्यासाठी हुमायूँ काबूलवर चालून आला आणि त्याला काबूलवर विजय मिळाला. त्याने बैरामखानला काबूल किल्ल्याचा सुभेदार म्हणून नेमलं आणि अकबराला २ वर्षांनी काबूलला आपल्याजवळ आणलं.

सन १५४५ सालात, अकबर ज्या दिवशी आपल्या पित्याकडे आला तेव्हा तो ३ वर्षे, २ महिने, ८ दिवसांचा होता..हूमायूँने मग अकबराची सुंता करायचं ठरवलं..त्यासाठी हमिदाबानूला कंदाहारहून काबूलला किल्ल्यात बोलवून घेतलं..हमिदाबानूला पुढे मरियम मकानी नाव मिळालं..हमीदाबानू २ वर्षांच्यानंतर आपल्या मुलाला बघणार होती..हमिदाबानू आल्यावर हूमायूँने ३ वर्षाच्या अकबरची परीक्षा घेण्यासाठी तिला इतर स्त्रियांच्या घोळक्यात साध्या कपड्यांमध्ये बसवलं आणि अकबराला आई शोधायला सांगितलं..३ वर्षांच्या अकबरने आपली आई नेमकी ओळखली आणि तो तिच्या कुशीत शिरला..सगळे अकबरच्या या तीव्र स्मरणशक्तीचं आश्चर्य करत राहिले.

भविष्यातही अकबर विलक्षण स्मरणशक्तीसाठीच प्रसिध्द होता..तो स्वत: निरक्षर होता पण सर्व धर्मांची आवड असलेला अकबर, विद्वानांच्या चर्चा आणि वादविवाद यातून ज्ञान मिळवत असे..तो मतप्रदर्शन करू लागला की एखाद्या पंडितासारखी त्याची भाषा असे..२४००० उत्तमोत्तम विविध विषयांवरची, उत्तम वेष्टण घातलेली ग्रंथसंपदा त्याच्याकडे होती आणि वाचायला नेलेलं पुस्तकं परत आणलं नाही तर तो रागावत असे..हे ग्रंथ तो वाचून घेत असे आणि तो सगळं मजकूर त्याच्या लक्षात राहत असे..जगातील सर्व प्रेषित निरक्षरच होते, म्हणून घरात एकाने तरी निरक्षर असावं असा त्याचा दावा होता..पुस्तकामद्धे विषयानुरूप चित्रे घालण्याची कल्पना आणि सुरुवात त्यानेच केली..

या सर्व भारतीय जैन, बौद्ध, हिंदू ख्रिश्चन धर्मातील चांगले विचार घेऊन त्याने दिन ए इलाही हा धर्म स्वत:च्या विचार मंथनातून निर्माण केला..आजच्या भारतीय राजकारण्यांना आणि भारतीय राजकारणाला, त्याचा हा धार्मिक दृष्टीकोन घेण्यासारखा आहे..त्याने शिया आणि सुन्नीच्या कट्टर पंथियांना भांडण्याची बंदी केली होती..

**राजा भारमल** - सम्राट अकबर नेहमी अजमेरला ख्वाजा मोईनुद्दीन चिश्तिच्या भेटीला जात असतांना अंबरचा राजा भारमल याने त्याची भेट मागितली..या भारमलचा पुतण्या सुजा आणि शर्फुद्दीन नावाचा शत्रू, भारमलची अंबर राजधानी जिंकण्याच्या प्रयत्नात होते..आपलं घराणं आणि सत्ता नामशेष होणार म्हणून भारमलने अकबराची भेट घेऊन मदत मागितली आणि आपली राजकन्या त्याला देऊ केली..अकबराने त्याला मान्यता दिली..सांभर इथे हा

विवाह सोहळा मोठ्या थाटाने पार पडला. भारमलचा नातू राजा मानसिंग हा नवरत्नांपैकी एक होता..मध्य युगातील राजकारणात ही फार मोठी कलाटणी देणारी घटना होती..या आधीही अफगाणी सुलतानांचे हिंदू मुलींशी विवाह झाले होते, त्यावेळी या मुलींचं आधी धर्मांतर करायचं अशी प्रथा होती, पण या अंबरच्या राजकन्येला अकबराने मुसलमान होण्याची सक्ती केली नाही..तिचाच मुलगा सलिम उर्फ जहांगीर..या एका विवाहामुळे रक्तपात न होता अकबराने राजपूतांना जिंकलं आणि त्यांच्यात फूट पडली..अकबराच्या बाजूने सारे राजपूत राणा प्रतापविरुद्ध लढले, हा त्याच्या राजकीय डावपेंचाचा विजय.

**प्रसंगावधान -** सम्राट अकबराला, रात्री अपरात्री एकटंच, वेषातंरात लोकसमुदायात हिंडून आपल्या कारभाराबद्दल प्रजेचं काय मत आहे हे जाणून घ्यायची सवय होती..एकदा तो एकटाच रात्री आग्र्यात बाहेर पडला.. त्याला यमुनेच्या तीरावर रात्रीच्या मुक्कामाला थांबलेला, सालर मसाऊद गाझीच्या उरुसाला बहरैचला जाणारा जथा दिसला..तो त्या जथ्यामधे मिसळून, त्यांच्या बादशहाबद्दल गप्पा मारायला लागला तेव्हा तिथल्या एका माणसाने हा बादशहा आहे असं म्हटलेलं ऐकलं..आपल्याला कुणीतरी ओळखलंय हे कळल्यावर सम्राट अकबर सावध झाला..तो माणूस काही लोकांना घेऊन बादशहाजवळ आला, तेव्हा अकबराने आपले डोळे चकणे केले, ओठांची ठेवण बदलली आणि चेहऱ्यावर कमालीचे बावळट भाव आणले. त्याच्या जवळ आलेले लोक, हे डोळे बादशहाचे नाहीत, हे ओठ, हा चेहरा बादशहाचा नाही असं परत परत त्याच्या चेहऱ्याला निरखत एकमेकांच्यात बोलू लागले

तेव्हा, त्या संधीचा फयदा घेऊन, अकबर सटकला आणि राजवाड्यात आला..हा विलक्षण बुद्धिमान अकबर वयाच्या १३ व्या वर्षी बादशहा बनला.

अकबराला शिकारीचा अतिशय नाद होता..पशू पक्षी सांभाळायचीही आवड होती..आपल्या माहूताला दाद न देणाऱ्या माजलेल्या हत्तीच्या पाठीवर बसून त्याला तो वश करत असे इतका साहसी वृत्तीचा होता..शिकारीला अनेक वेळा जंगलातून तो पायी चालत जात असे, तेव्हा एका वाघाने त्याच्यावर अचानक हल्ला केला..अकबराने आपल्या तलवारीने वाघाला झटक्यात कापून काढलं इतका दणकट शरीराचा आणि बेडर स्वभावाचा होता..अनेक जनावरांना तो शिक्षण देत असे..त्याने अनेक हिंस्त्र प्राणी बाळगले होते..त्याच्याकडे १००० चित्ते होते..प्रत्येक प्राण्याची नावे त्याला तोंडपाठ होती..त्यांच्या तब्येतीकडेही बादशहाचं बारीक लक्ष असे..फत्तेपूर सिक्रिला त्याच्या राजवाड्याजवळ मोठेमोठे तबेले, पागा, हत्तीखाने होते..

अकबरबादशहा इतका बहूआयामी होता की त्याला सोनारकाम, गालिचे, पडदे बनवणे, रंगवणे, तोफा ओतण्याचं यांत्रिकी ज्ञान, आणि दगडावर कोरीवकाम करण्याचं कौशल्यही होतं..राज्यकारभारावरचा ताण घालवण्याचा त्याचा तो मार्ग होता..लोकांना तो हे काम करतो आहे असं वाटे, तेव्हा त्याच्या मनात मात्र कारभारचेच विषय घोळत असत..

परमेश्वरावर त्याची नितांत श्रद्धा होती..अयोग्य गोष्टींची तहान आणि स्वत:चा बडेजाव हा दु:खाचं मूळ आहे यावर त्याचा विश्वास होता.. म्हणून तो एक उदाहरण देत असे..तो म्हणत असे की, ज्याप्रमाणे नदीवरून पाण्याचे घडे

डोक्यावर ठेऊन खाचखळग्यातून चालणाऱ्या स्त्रिया आपला तोल ढळू देत नाहीत, तसा तोल माणसाने आपल्या घडयात ठेवला तर अपाय होत नाही..काबूल ते गुजरातपर्यंतचं साम्राज्य सांभाळणारा, आपल्या पुत्राने, स्वत:विरुद्ध केलेलं बंड मोडून काढणाऱ्या सम्राटाचं हे वाक्य आहे..

त्याला ३ मुलगे आणि ३ मुली होत्या..दानीयल आणि मुराद हे मुलगे अल्पवयात मरण पावले होते..सम्राट अकबराचा आजारपणात अंत जवळ आला..सलीमाने बापाविरुद्ध बंड केलं पण बादशाहाने सलीमला माफ केलं, आणि त्याच्या अंगावर बादशाही वस्त्रे, फेटा आणि हुमायूँची कट्यार बांधायला लावून आपला पुढचा वारस केला..त्यानंतर काही तासातच लगेच त्याचा अंत झाला..वयाच्या ६३ व्या वर्षी, २७ ऑक्टोबर, सन १६०५ मध्ये त्याचा अतिसाराच्या आजारपणात अंत झाला..

हिंदूप्रमाणे सकाळी सूर्योपासना करणारा, ख्रिश्चनांप्रमाणे मूर्तीत विश्वास ठेवणारा, जैन - बौद्ध धर्मांचा अभ्यासक, साहसी योद्धा, कुशल मुरब्बी राजकारणी, विद्वान, हिंदू मुस्लिम दरी बुजवणारा, अशा सर्वधर्मीय सम्राट अकबराची या देशाला गरज आहे..

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss-ss.

# बादशहा बहादूरशहा जफर.

**All the world is stage, and all the men and women are merely players.**

जगाला रंगमंच म्हणणाऱ्या शेक्सपियरचा बाप असलेल्या विधात्याने १९ व्या शतकात नवीन डाव मांडला..पिढ्यानपिढ्या राजप्रासादात ऐश्वर्य भोगत असलेल्या जगभरच्या राजघराण्यांना त्याने १९ व्या शतकाच्या मध्यात मिटवत आणलं..भारतात लॉर्ड डलहौसिने वारस नाहीत म्हणून एकेक संस्थानं ब्रिटीशांच्या सत्तेखाली आणायला सुरुवात केली..या जगाच्या रंगमंचावरील एक पात्र म्हणजे, मुघल बादशाहीतील अखेरचा वारस बहादूरशहा जफर..२४ ऑक्टोबर १७७५ या दिवशी, याचा अबुजफर मुहम्मद सिराजुद्दीन बहादूरशहा या नावाने त्याने मुघल राजघराण्यात प्रवेश केला.. विधात्याने त्याच्या मस्तकावर सुवर्ण मुकुट आणि अंगावर हिऱ्यामोत्याच्या माळा घालून वाढवलं आणि शेवटी दिल्लीहून दूर, रंगूनमध्ये चारपाईवर कैदखान्यात सूती कपड्यांमध्ये, वयाच्या ८७ व्या वर्षी, ७ नोव्हेंबर,१८६२ मध्ये पक्षाघातामुळे त्याची exit केली..

सन १५२६ सालात समरकंदहून आलेल्या बाबर नावच्या अफगाणी युवकाने भारतात येऊन, आपल्या राजमहालाचं आग्र्यात जोतं बांधलं.. त्यावर हूमायूँ, अकबर, शहजहान, आणि शेवटी औरंगजेबाने जगभर कीर्ती होईल असा उंचच उंच प्रसाद रचला..मग ३५० वर्षांनी द्वितीय शाह आलमच्या काळात या रंगमहालाचा पाया डळमळीत झाला..इंग्रजांनी दिल्ली दरबार काबिज केला, त्यात १८३७ सालापासून बादशहा अकबर द्वितीय हा नामधारी बादशहा राहिला..नोकरचाकर, दासदासी, राजवाडा, हिरे मोती सोनं-रूपं याशिवाय दुसरं आयुष्य माहीत नसलेल्या या बहादूरशहा जफरच्या नाट्याला सुरुवात झाली ती अचानक आलेल्या भाग्यदशेने..

बहादूरशहाचं आपल्या बापाशी, बादशहा अकबर द्वितीयशी अजिबात पटत नव्हतं..बहादूरशहाच्या राजपूत आईचं नाव महाराणी लालबाई होतं..या अकबर बादशाहाच्या दुसरी बेगम मुमताजमहलला आपला मुलगा मिर्झा जहांगीरला बादशहा बनवायची महत्त्वाकांक्षा होती..पण सत्ताधारी इंग्रजांनी ते अजिबात मान्य केलं नाही..जहांगीरचा उद्धट स्वभाव, व्यसनीपणा, आणि फटकळपणा त्याला कारण होता..दिल्लीचा कारभार इंग्रज रेसिडेंट seton याच्या हाती होता..तो इंग्रज दरबारात आला की हा जहांगिर, लुलू लुलू म्हणत असे..म्हणून Seton ने लुलूचा अर्थ विचारून घेतला..लुलूचा अर्थ हैवान आहे हे कळल्यावर रेसिडेंटने आपली हैवानी दाखवण्याचा निश्चय करून त्याची बादशाही नामंजूर केली..त्यातच या जहांगीराने रेसिडेंटवर गोळी चालवली तेव्हा रेसिडेंट योगायोगाने वाचला पण जहांगीर मात्र कैदेत पडला..आता तर तो बादशहा बनणे शक्यच नव्हतं..जहांगिर अटकेत पडल्यावर त्याच्या सुटकेसाठी

मुमताजमहलने त्याच्या सुटकेसाठी नवस केला..मेहरोलीच्या हजारत ख्वाजा कुतुबुद्दीन बख्तियार काकीच्या कबरीवर चादर घालण्याचा नवस केला..जहांगीर सुटून आल्यावर मोठ्या समारंभाने फुलांची चादर आणि फुलांचा पंखा करून राजेशाही थाटात मिरवणूक निघाली..गावातील हिंदू, मुसलमान दोन्ही लोक त्यात सामील झाले..आधी मेहरोलीत चादर आणि मग जोगमाया मंदिरातही फुलांचा मोठा पंखा लटकवून फूलवालोंकी ही सैर संपली..मग दरवर्षी ही सहल निघू लागली, इतका तो समारंभ लोकप्रिय झाला..

बादशहा अकबरचा २८ सप्टेंबर १८३७ ला रात्री २ वाजता मृत्यू झाला तेव्हा आता गादीला वारस होता फक्त अबुजफर म्हणजेच बहादुरशहा जफर..मध्यरात्री बापाच्या मृत्यूची बातमी कळताच, ६२ वर्षांचा अबुजफर उतावीळपणे शाही कपडे घालून सिंहासनावर बसायला तयार झाला, पण ज्योतिषांनी त्याला सल्ला दिला की राज्यारोहणाची ही अत्यंत अमंगळ वेळ आहे..सकाळ होऊ दे मग, सिंहासनावर बसा..पण अबुजफरने ते ऐकलं नाही..त्याने आज्ञा दिली की सूर्यप्रकाशाएवढा उजेड मशाली आणि ज्योतींनी करा..पण मी आत्ताच तख्तावर बसणार..असं म्हणून अबुजफर मृत अकबर द्वितीय बादशहाच्या मुखावर पाय ठेवून तख्तावर चढला..मृत बादशहाच्या मुखावर पाय देऊन तख्तावर चढणे ही मुघलांची पारंपारिक प्रथा होती.. बादशाही मिळाल्यावर त्याने स्वत:ला अबुजफर मुहंमद सिराजुद्दीन बहादूरशहा असा किताब घेतला..हा मुघल सल्तनीचा २० वा बादशहा बनला.. नौबतींच्या आणि तोफांच्या आवाजाने ही बातमी जनतेला कळली..

एकेकाळी काबूल ते विजापूर, गोलकोंडापर्यन्त पसरलेल्या साम्राज्याचा वारस आज फक्त आजची जुनी दिल्ली ते आताचं पालम (विमानतळ) इथपर्यंतच्या भूभागाचा बादशहा मालक होता..आणि लाल किला एवढंच हुकूमत चालण्याचं ठिकाण होतं..सगळा कारभार इंग्रज रेसिडेंटच्या हाती होता..सालींना १ लाख रुपयाची पेन्शन बादशहासाठी इंग्रजांनी मंजूर केली होती..बहादूरशहाने पेन्शन वाढवा अशी विनंती केली की तुम्ही लाल किल्ल्यातील वास्तव्य सोडा, आणि महरोलीतील किल्ल्यात जाऊन रहा असं उत्तर येई..त्यामुळे त्याचा नाईलाज होई..पण प्रजेचं बहादूरशहावर प्रेम होतं..गरीब, अनाथ, विधवा, यांच्यासाठी त्याने महिने निश्चित केले होते, त्यावेळी तो या सर्वांना ४ आणे, ८ आणे, अशी रक्कम वाटत असे..गावातील कुणीही उपाशी राहू नये म्हणून त्याच्या जेवणापूर्वी किल्ल्यात मुदपाक खान्यात रोज ७ मण गव्हाच्या रोट्या आणि ५ मोठे मोठे हंडे सालन म्हणजे तोंडी लावणं बनत असे..बादशाहा जेवायला बसला की चोपदार जोरात हाळी देत म्हणे की, “ तुआम मुबारक..” आणि लगेच ते जेवण गरीबांना वाटलं जाई..

किल्ल्यात रोजचं कोणता ना कोणता हिंदू-मुस्लिम सण, वाढदिवस, लग्न, वर्षादिन जोरात साजरा होई..दसरा ९ दिवस साजरा होई..शेवटच्या दिवशी भरत मिलाफ हे नाटक होऊन समारंभ संपे..त्यानिमित्ताने रुचकर स्वयंपाक तयार होई, आणि प्रतिष्ठित सरदार, अन्य लोकांकडे पोचवला जाई..तऱ्हेतऱ्हेच्या कपड्यांचं, वस्तूंचं वाटप केलं जाई..होळीचा सण मोठ्या जोशात दिल्लीत साजरा होई..मग एक दिवस बादशाची तुला केली जाई.. एका पारड्यात

बादशहा आणि दुसऱ्यात ७ प्रकारची धान्ये आणि सोनं चांदी भरून मग ते सगळं गरिबांमद्धे वाटलं जाई..

बहादूरशहा स्वत: उत्तम निशाणेबाज होता..पहाटे पहाटे तो काचेच्या बंद नालकीमधून (पालखीचा दुसरा प्रकार) जंगलात शिकारीला जाई.. जंगलाजवळ आला की नालकीतून उतरून घोड्यावर बसे आणि शिकार खेळे..अश्वारोहणात त्याचा हात धरणारा दुसरा कुणी निपुण नव्हता..नेमबाजीतही तो निष्णात होता..त्याच्या आपल्या दिवाणखान्यात ३ मण बाजरीची पोती लटकावलेली असत..एका मोठ्या धनुष्याला तीर लावून अशी प्रत्यंचा ओढे की तो बाण तिन्ही पोत्यांमधून पार होऊन जाई..तो उत्तम अश्वपारखी होता..त्याच्या हत्तीखान्यात अनेक हत्ती आणि पागेत उत्तमोत्तम घोडे होते..हजारो मधुर आवाजांचे बुलबुल, रंगबेरंगी पक्षी होते. कबुतरे होती..

कोंबड्यांची झुंज, कबुतर बाजी, पतंग उडवणे, नामवंत शायरांना बोलावून कवि संमेलन करणे, यात त्याचा बराच वेळ जाई. कोंबड्यांची झुंज आणि कबुतरबाजीच्या खेळात हजारो रुपयांची उलाढाल होई..बादशाहाचा एक सय्यद वारीस अलीशाह नावाचा कबुतरबाज म्हणजे शिक्षण देणारा होता, त्याने कबुतरांचा एक थवा असा शिकवून तयार केला होता की बादशहा सकाळी हत्तीवरून नमाजासाठी बाहेर पडला की तो थवा हत्तीच्या चालण्याच्या गतीने सावली तयार करून त्याच्यावरून उडत..पतंग उडवणे हा तमाम दिल्लीवाल्यांचा अत्यंत आवडता खेळ होता..पतंग उडवयाला सारे लोक किल्ल्यात जमत किंवा नदीकाठी जमत..तिथे बादशहा हत्तीवरून येई..तो आला की नदीकाठावरील वाळूत नागरिकांचा खेळ सुरू होई..पतंगचे दोर २० / ३०

रुपये शेर भावाने विकले जात..ज्याला पतंग मिळे त्याला ५ रुपये बक्षीस मिळत..कधी कधी बादशहा स्वत:ही त्यात सामील होई..हातात चक्री धरून ढील देई, कधी पतंग उडावे आणि निघून जाई..

स्वत: बादशाहा बुद्धिमान होता, अरबी-फारसी-उर्दू-पंजाबी या अनेक भाषांचा, साहित्याचा जाणकार होता..उत्तम कवि होता..उत्तम सुलेखनकार होता(calligrapher)..हस्तीदंतावर कोरीव काम करण्यात प्रवीण होता..अनेक गवई-कलावंतांचा तो आश्रयदाता होता..त्याच्याकडे मोठे मोठे गालिबसारखे शायर गोळा होत आणि जलसा होई..त्यात खुद्द बादशहा बहादूरशहा आपलीही गझल म्हणत असे..

असेच दिवस जात राहिले..बहादूरशहा म्हातारा होत चालला..आणि मग काळाने कूस बदलली..खेळ बदलला..इंग्रजांच्या दडपशाहीने राजा ते रंकापर्यंत दबून राहिलेला असंतोषाचा उद्रेक आता एका ध्वजाखाली आला..खालसा झालेले राजे आणि मिठाच्या जुलमी कराने, धर्मांतरच्या सक्तीने चिडलेली जनता अस्वस्थ व्हायला लागली..दुसऱ्या बाजीरावांचे पुत्र नानासाहेब पेशवा मग १८५७ च्या क्रांतीचे जन्मदाते ठरले. कानपूरजवळच्या ब्रह्मावर्ताला गुप्त संघटना तयार झाली..अवध, बंगाल, झांसी, दक्षिणेला सातारकर, कोल्हापूरचे राजे, दक्षिण भारतातील राजे, असे उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतचे सारे संस्थानिक गुप्तपणे एकत्र आले..३१ मे १८५७ हा क्रांतीच्या उठावाचा दिवस ठरला..

या सर्व कटाची आखणी इतकी गुप्तपणे झाली की इंग्रजांना याचा पत्ताही नव्हता..इंग्रजांच्या तडाख्यातून सुटण्यासाठी आणि लोकांना संघटित करण्यासाठी एक नवी शक्कल फैजाबादच्या मौलवी अहमद शहा यांनी शोधली..गावागावातील चौकीदारकडे बाहेरून साध्या गव्हाच्या चपात्या येऊ लागल्या..गावातील नागरिक त्याचा एकेक तुकडा खात आणि तशाच पोळ्या बनवून पुढच्या गावात पाठवत..एकही अक्षर न लिहिलेला हा स्वराज्य आणि स्वातंत्र्याच्या क्रांतीची शपथ घेणाऱ्यांसाठी गुप्त संदेश होता..इंग्रजांनी शोधलं असतं तरी त्या पोळीत काहीही सापडलं नसतं..त्यांनी आणि पंडितांनी गावोगाव फिरून सगळ्या घरांमध्ये चपात्या वाटल्या, आणि दुसरीकडे, फौजेतील शिपायांनी एकमेकांना कमळ देऊन, **सब लाल हो गया** हे परवलीचं वाक्य म्हटलं..चपाती आणि कमळाने साऱ्या देशाला गुप्तपणे एकत्र आणलं..तमाम हिंदू-मुसलमान एकदिलाने त्या क्रांतीत राष्ट्रासाठी सामील झाले ही त्यातील अपूर्व मोठी गोष्ट होती..

पण घात झाला.. काहीच दिवस आधी, ९ मे या दिवशी, मिरतमध्ये मंगल पांडेने डुक्कर आणि गायीची चरबी लावलेल्या नवीन काडतुसावरून बंड केल्यावर क्रांतीचा मोठाच उद्रेक झाला..सामूहिक उठावाचा ३१मे तारखेचा ठरलेला खेळ मोडला..इंग्रज अधिकाऱ्यांनी बंडाच्या मंगल पांडेच्या साथीदारांना कैद केलं..संध्याकाळी काही शिपाई मिरतच्या रस्त्यावरून जात असतांना गावातील वेश्यांनी या शिपायांना शिव्या घातल्या आणि चुल्लूभर पानिमे डूब मरो, असं हिणवल्यावर सगळेच बिथरले..

दुसरे दिवशी घोडदळाचे २००० सैनिक दिल्लीवर ताबा मिळवण्यासाठी दिल्लीकडे धावायला लागले..त्यदिवशी दिल्ली अजून हळूहळू जागी होत असतांना, घाटावर स्नान, पूजा करणारांना सकाळी ८ वाजता, अचानक यमुनेपलिकडून, जमुना मैयाकी जय हो असा पुकारा करत येणारे सैनिक दिसले..शहरात हे घोडदळ शिरल्याबरोबर त्यांनी सिलमपूर चौकीला आग लावली..तारघरचा ऑफिसर Tod ला ठार केलं..दुसरा बळी कर्नल रिप्लेचा पडला..तिथून सगळी फौज किल्ल्याच्या जवळ कलकत्ता दाराशी गेले..त्यांना आत शिरायचं होतं पण तो दरवाजा बंद पाहून ते जिथे बादशहा बसला होता, तिथे आले..बादशहाला पाहून म्हणायला लागले की आपण दीनांचे कैवारी आहात..धर्मरक्षणासाठी आपणाकडे आलो आहोत..आता बादशहाला या उठावातील आपला सहभाग लपवणं शक्य नव्हतं...त्याने किल्लेदार डग्लसला बोलावणं पाठवलं आणि तो आपल्या महालात निघून गेला..राजवाड्यात लोकांची गर्दी उसळली..हिन्दी सैनिक बादशहाच्या नावाचा पुकारा करून घोषणा देऊ लागले..

खरं तर रोज रात्री शहराचे दरवाजे रात्री बंद केले जात असत पण राजघाटावरचा दरवाजा उघडा दिसल्याबरोबर सारे बंडखोर तिथून गावात शिरले आणि दंगा सुरू झाला..एकेक गोरा ऑफिसर या बंडखोरांनी मारायला सुरुवात केली..दिल्लीतील नागरिकही त्यांना सामील होऊन गोऱ्या लोकांना मारायला लागले..दिल्लीत प्रचंड लुटालूट, कापाकापी सुरू झाली..तुरुंगातले कैदी त्यांनी सोडवले..इंग्रजांची पळापळ सुरू झाली..त्यांनी आपल्या तोंडाला काळा रंग फासून भारतीय बनण्याचा प्रयत्न केला..प्राण वाचवण्यासाठी कुणी

कबिराचे दोहे म्हणत आपण हिन्दी आदमी असल्याचा आव आणला. काही इंग्रज कुटुंबाला घेऊन जंगलात पळाले.

या लुटालुटीत भयंकर नाश झाला तो इंग्रजांच्या दारूगोळा कोठाराचा..त्यात ९ लाख काडतूसे, १०,००० रायफली आणि सुरुंगांच्या अनेकानेक माळा होत्या..क्रांतिकारक ते उडवायला येणार हे कळल्याबरोबर, त्या कोठाराच्या अधिकाऱ्याने स्वत:च ते कोठार पेटवून टाकलं..हजारो तोफा एकदम उडाव्यात असा भयंकर स्फोट झाला, त्यात कोठार उडवायला आलेले ३००० लोक जगाच्या जागी मेले..११ मेपासून १६ मेपर्यंत ही दंगल चालली..पण एकाही गोऱ्या स्त्रीला आपल्या सैनिकांनी हात लावला नाही..५ दिवसांनी भारतीय ध्वज किल्ल्यावर झळकू लागला..

या दरम्यान तारघरातून अंबाल्याला इंग्रजांना बातमी पोचवली होती, त्यामुळे ब्रिटिशांची फौज तिथे ३ दिवसात येऊन पोचली..ही धुमश्चक्री चालू राहिली..२० सप्टेंबरला ५ महिन्यांनी इंग्रजांनी दिल्ली ताब्यात घेतली..या क्रांतिकारकांकडे ना शस्त्रे होती, ना पैसा..त्यात फितुरांनीही इंग्रजांना सर्व गुप्त बातम्या देऊन मदत केली होती..या उठावात दिल्ली उजाड झाली. बेचिराख झाली..मग मात्र साऱ्या भारताचंच एक यज्ञकुंड झालं..सर्व संस्थांनांमध्धे राजघराण्यांची आहुति पडायला लागली आणि साहसी देशभक्त क्रांतिकारकाचे देह मशालीसारखे उजळायला लागले..

यानंतर बादशहा बहादूरशहा जफर लाल किला सोडून हुमायूँच्या मकबऱ्यात राहायला गेला..तिथे तोफखान्याचा प्रमुख जुना सुभेदार बख्त खाँ पोचला आणि बादशहाला म्हणाला की माझ्याबरोबर चला, आपण

हिमालयात बसून परत सैन्य जमवू..ही बातमी इंग्रजांच्या गुप्तहेरांना कळली..बादशहाच्या भोवती त्याचे संरक्षक होते..त्यांच्या मध्ये जाऊन बादशहाला लगेच हातकड्या घातल्या..



इंग्रज अधिकारी Hodson याला बादशहा आणि त्याच्या 3 शहजाद्यांना घेऊन शहरात येत असतांना काही लोकांनी त्यांना पाहिलं आणि बादशहाला सोडवायचा प्रयत्न केला, पण इंग्रजांनी सरळ गोळ्या चालवल्या..त्यात बादशहाचे ३ मुलगे मारले गेले..बादशहा आणि झीनतमहलला तिच्याच हवेलीतील एका महालात चौपाईवर बसवलं..मयूर सिंहासनापासून चौपाईपर्यंतचा भोग पाहणारा, पांढऱ्या कपड्यातील तो दुर्दैवी बादशहा शून्यात पाहत काहीतरी बडबडत होता..इंग्रजी अधिकारी त्याला पाहायला गर्दी करत

होते..रोजचे २ आणे त्याला मंजूर केले होते..झीनत महल एका मळकी चादर घातलेल्या आसनावर बसली होती..

२७ जानेवारीला लाल किल्ल्यातच, दिवाने खास मधील इंग्रजांनी भारावलेल्या कोर्टात त्यांना दोघांना आणलं..३ महीने खटला चालवण्याचा नाटक झालं..आणि नंतर रंगूनला पाठवलं..तिथे ७ नोव्हेंबर १८६२ या दिवशी पहाटे ५ वाजता, विधात्याने रचलेल्या या पात्राचा कैदेतच शेवट झाला..एवढे कडकडीत वसंत-ग्रीष्म-वर्षा ऋतु पाहिलेला, एकेकाळी भारताच्या सर्वोच्च स्थानावरचा बादशहा रंगूनच्या मातीतच मिसळला..त्याची शेवटची, आपल्या पूर्वजांच्या महरोलीमद्धे दफन करण्याची इच्छाही पूर्ण झाली नाही..

न किसिके आंखका नूर हूँ l न किसिके दिलका करार हूँ l

जो बिगड गया वो नसीब हूँ l जो उजड गया वो दयार हूँ l

आपल्याच वास्तवाचे कढ त्याच्या हृदयातून वाहायला लागले。

अशा विराण भावनांच्या दडपणात एकांतात तो खंगत गेला..

कितना बदनसीब जफर, दफनके लिए

दो गज जमींभी न मिल सकी कूए यार में l

त्याने स्वत:च लिहिलेला शेर खरा झाला..

ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—ss—s—ss—

# चाफा बोलेना..

साहित्य - नाट्य – अभिनय आणि चित्रपट या क्षेत्रात रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्यांपैकी आजचं सर्वमान्य आणि सुपरिचित नाव म्हणजे पु. ल. देशपांडे..त्यांनी आपल्या साहित्यातून फक्त सामान्य माणूस रंगवला..त्यामुळेच मध्यम वर्गीय मानसिकेतेतील रंग आणि व्यंग आपल्या सहजसुंदर अभिनयातून आणि वक्तृत्त्वातून पोचवून, जनमानसाचा लोभ त्यांनी भरभरून मिळवला..पेटीवादन हे पु. लंच दुसरं निर्व्याज जिव्हाळयाचं आनंद स्थान..म्हणूनच “विश्रब्ध शारदा” सारख्या, चित्रपट, साहित्य, नाट्य आणि संगीताच्या क्षेत्रातील कलाकारांच्या पत्रसंभाराच्या ग्रंथाला प्रस्तावनेसाठी त्यांच्यासारखा या सर्व साहित्य कला क्षेत्रातला अधिपति दुसरा कोण मिळणार..?

हेच सर्वप्रियतेचे स्थान पटकावणाऱ्या, मागच्या शतकातील महाराष्ट्रातील सरस्वतीच्या दुसऱ्या सुपुत्राचं नाव म्हणजे गोविंदराव टेंबे..

मराठी रंगभूमीच्या आकाश मंडळात सांगलीच्या विष्णूदास भाव्यांच्या नाटक, खेळ या कल्पनेने साहित्यिक आणि कलाकारांचं भव्य तारांगण फुललं. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या लेखणीने लेखन विश्वात नवीन क्रांती केली. त्यांचं शाकुंतल गाजायला लागलं, पाठोपाठ आलं सौभद्र...या काळात अनेक

लेखक, गायक, कलाकार प्रकाश झोतात आले..त्यात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी मास्तर, वसंत शांताराम देसाई, यांच्यासारखे अनेक नामवंत लेखक आपल्या कल्पना विलासाने रंगभूमी उजळायला लागले. नाट्यसृष्टीच्या पाठोपाठ, भारतीय क्षितिजावर दादासाहेब फाळके हा तारा अचानक चमकायला लागला..त्यांनी साऱ्या कलाविश्वाचा एक चंदेरी चमचमणारा पडदा बनवून टाकला..त्या मराठी सुवर्ण काळात, रंगभूमीवरचा आणि चित्रपटामध्ये एक अनेक पैलूंनी चमकणारा तारा म्हणजे गोविंदराव टेंबे.

खरं म्हणजे गोविंदराव टेंबे हे हार्मोनियम वादक..ही बाजाची पेटी हे वाद्य इंग्रजांच्या बरोबर भारतात आलं..इंग्लंडमध्ये सन १८३३ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर जॉन ग्रीन कंपनीने ते वाद्य बनवलं आणि १८४३ मध्ये मूर्त स्वरूपात ते विक्रीला आलं..इंग्रजांनी ते भारतात आणलं..ते वाद्य महाराष्ट्रातील जनमानसात रुजवण्याचं काम टेंब्यांनी आपल्या अद्भूत पेटीवादनाने केलं. गायकीचा भास त्यांनी आपल्या पेटीवादनातून रसिकांना करवला इतकी त्यांची बोटं संवादिनीवर नाचत असत..“त्या खोक्यासारख्या टाईपरायटरला त्यांनी नाचायला लावलं” अशी त्यांची ख्याती होती. दुसरीकडे गायक म्हणूनही त्यांची ख्याती होती आणि कचाच्या नायक भूमिकेतही ते गाजले.

गोविंदराव टेंबे गायक, नट, पेटीवादक तर ते होतेच, पण गीतकार म्हणूनही त्यांनी लौकिक मिळवला होता..म्हणून भास्करबुवा बखल्यांनी खाडिलकरांच्या नाटकांना गीतं लिहिण्यासाठी गोविंदराव टेंब्यांनाच हाताशी धरलं. तुळसीदास नाटकातील बालगंधर्वांनी गायलेलं आणि घराघरात रसिकांच्या मनात रुतलेलं अजरामर गीत **“रामरंगी रंगले मन”** याचे गीतकार

गोविंदराव टेंबेच..त्याकाळी प्रसिध्द झालेली अनेक गीतं त्यांची होती. उत्तम साहित्यिक म्हणूनही त्यांची ख्याती होती..अनेक चित्रपटांचे संवाद, नाटकातील संवाद, स्फुट निबंध त्यांनी लिहिले..मोठ्या भक्तीभावाने, परिश्रमाने त्यांनी अभ्यासपूर्ण असं अल्लादियाखाँ याचं चरित्र लिहिलं. ऑस्कर वाईल्डच्या नाटकाचंही त्यांनी भाषांतर केलं होतं.

संगीतात दहा थाट पुरेसे नाहीत, ते निदान १४ तरी असायला हवेत हे त्यांना जाणवत होतं. इतकंच नव्हे तर धैवत आणि रे कोमल. नी तीव्र असलेल्या सप्तकाला त्यांनी धरणी नाव, राधा म्हणजे रे-ध- तीव्र आणि बाकी कोमल स्वर, अशी नावं हवीत असा त्यांचा आग्रह होता. नर्म विनोदी लेखन करण्यात ते अग्रेसर होते. या बहुआयामी कलावंताला गुरु मात्र कुणीही नव्हता. ते स्वयंभू एकलव्य होते. त्यांनी मराठी नाट्यचित्र क्षेत्रात मोठा हातभार लावला आणि ती सृष्टी संपन्न केली.

मागचं शतक, नाट्यगीते, भक्तिगीते, भावगीते, कोळीगीते, कव्वाली गीते, शाहिरी पोवाडे, भजने, संतांचे अभंग, हिन्दी – मराठी चित्रपट गीते, गवळणी, बालगीते, यांच्या सुमधुर स्वर आणि शब्दांच्या दुथडी भरून वाहणाऱ्या गंगेने संपन्न झालं होतं..भा. रा. तांबे, राजा बढे, बोरकर, गदिमा, पी. सावळाराम, सुधीर मोघे, आरती प्रभू, सुरेश भट, ग्रेस, महानोर, वा. रा. कांत, शांता शेळके, किती नावे घ्यावीत..? अशा अनेक सिद्धहस्त कवींनी वसंतबहार निर्माण केला होता..कवीला काय म्हणायचं आहे, ते रूपक त्यांना विचारल्यावरच संगीतकाराला त्याप्रमाणे स्वरांचा साज चढवता येत असे..बा. भ. बोरकरांनी, भा. रा. तांबे यांच्याकडे कवितेची विनंती केल्यावर " मधु मागसी

माझ्या सख्या परी मधुघटची रिकामे" आता कुठली प्रतिभा हे उत्तर होतं..आरती प्रभू यांच्या " ती येते आणिक जाते " या गीतात प्रेयसीचं येणं आणि जाणं नसून सरस्वती कवीला विषय सुचवते आणि काव्य पूर्ण करून द्यायला सांगते हा अर्थ कवीने सांगितल्याशिवाय कळणार तरी कसा..?

"नाहुनीया उभी ती सुकवीत केस ओले, वेड्या मुशाफराने त्याचेच गीत केले " म्हणणारे सुधीर मोघे, आणि " न झटको जुल्फसे पानी, ये मोती टूट जाएंगे, ह्या पंक्ति लिहिणारा हिन्दी सिने गीतकार, राजेंद्र कृष्ण यांना, या ओले केस पुसणे हावभावातलं काय मोहवतं, भुरळ घालतं हे कळायला पुरुषीच मन पाहिजे असं वाटायला लागतं..या " न झटको जुल्फसे पानी याची जन्मकथा तर अगदी चटकदार आहे..शब्दप्रभू राजेंद्र कृष्ण यांच्याकडून सिनेमातील situation प्रमाणे गाणं हवं असेल त्यांना एक महिन्याचा अवधि द्यावा लागे..आणि नेहमी ते शेवटच्या ३० व्या दिवसांपर्यंत काहीही लिहायचे नाहीत..अर्धा दिवस उरला आणि निर्माता दारात गीत मागायला आला की ३ मिनिटात ते गाणं लिहून देत..शहनाई या सिनेमाचा निर्माता आणि संगीत दिग्दर्शक रवी असेच त्यांच्या दारात गीत मागायला १ महिन्यानंतर येणार होते..राजेंद्र कृष्ण यांना काही केल्या शब्द सुचत नव्हते..इतक्यात त्यांची पत्नी बाथरूम मधून न्हाऊन बाहेर आली आणि आपले ओले केस पुसायला लागली, त्याक्षणी कविराजांच्या लेखणीतून काव्याचे मोती बिखरायला लागले, " न झटको जुल्फसे पानी.." कवीच्या वेदनेने भिजलेल्या भूमीतून गंगा वाहायला लागावी तसे शब्द झुळझुळायला लागत असावेत, नाहीतर ब्रायटन समुद्र किनाऱ्यावर " ने मजसी ने " ही कविता अमरत्त्व घेऊन प्रगटलीच नसती आणि

मंडालेच्या तुरुंगात मुघल बादशहा बहादूरशहा जफरच्या मुखातून " दो गज जमिं भी न मिलि कू ए यारमें " ही मंडालेच्या बंदिवासात उतरलेली व्यथा ओघळली नसती..आणि त्याच तुरुंगात गीतारहस्याची मांडणी करणारा एक महान योगी राहून गेला होता..सगळेच मनोबलाचे खेळ..

हेच घडलं चाफा बोलेना, चाफा चालेना या काव्याच्या वेळी.. मराठी सारस्वतांना अबोध राहिलेला अर्थ शोधून काढायचा चंग मग प्रो. वा. गो. मायदेवांनी बांधला..जेव्हा कवीला एकादी कविता स्फुरते, तेव्हा त्यातील आशय हा जनसामान्यांना माहीत नसतो..तशीच कवी नारायण मुरलीधर उर्फ कवि बी, या टोपण नावाने प्रसिध्द असलेल्या कवीची चाफा बोलेना ही कविता, त्यातील गेयता, आणि स्वररचना यामुळे खूप गाजली.

पण त्याचा अर्थ लावण्यात अनेक साहित्यकार आणि समीक्षकांची मति गुंग झाली..शेवटी प्रा. वा. गो. मायदेव यांनी कवी बी यांना सरळ पत्र लिहून अर्थ विचारला. तेव्हा स्वत: कवीनेच त्याचा अर्थ सांगितला. त्यांनी लिहिलं, "चाफा आणि ती तरुणी म्हणजे ब्रह्म आणि माया. ह्यांनाच आत्मा आणि जीव म्हणतो. चाफा म्हणजे आत्मा आणि जीव म्हणजे तरूणी. जीव विलासप्रिय असतो तरीही त्याला आपल्या सच्चिदनंद रूपाची म्हणजे आत्म्याची ओढ लागणारच. त्या भेटीने तेजी दिशा दाटून जाणे घडतं. चाफ्यात हृदयाने आत्म्याला खेळविले आहे, हृदयाने आत्म्याला आळविले आहे." अर्थ कळला नाही तरी भावगीत म्हणून हे गाणं लोकप्रिय झालं..सगळे सरस्वतीचे खेळ..


SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS—SS

**ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली**

**डॉ. स्मिता दामले यांची इतर 12 पुस्तके**






**ONE** click on cover/ Book will **OPEN**









इतिहासाची
विलग
पाने
डॉ. स्मिता दामले

डॉ. स्मिता दामले
कावेरीचा
दुभंग

डॉ. स्मिता दामले
एका
ओथमनचा
अंत

डॉ. स्मिता दामले
कलाटणी
CHINA
KUSHAN
SATAVAHANA
EMPIRE
PANDYAN
KINGDOM
CHOLAS

डॉ. स्मिता दामले
असं
घडलं
होतं

डॉ. स्मिता दामले
सल्तनत-ए-दिल्ली

डॉ. स्मिता दामले
दक्षा

मनसोक्त
डॉ. स्मिता दामले

डॉ. स्मिता दामले
सूर्यपुत्र
लोकमान्य

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १६ वे वर्ष.

## डॉ. स्मिता दामले यांचे हे बारावे पुस्तक.

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. त्यांची मध्ययुगीन इतिहासावर डॉक्ट्रेट झालेली आहे. त्या जरी अमेरिकेत रहात असल्या तरी सातत्याने भारतीय इतिहासाच अभ्यास व लेख त्या करत असतात. आजवर इतिहासात फ़ारशा न चर्चिल्या गेलेल्या भागांवर त्या लिहितात. हल्लीच्या गुगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यामुळे त्यांचे इतिहासावरचे पुस्तक अत्यंत वाचनीय असते. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत.

डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर

(८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन

व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।